# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**लाखीवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) समूह ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमताने केलेला गैरव्यवहार**

**(१) ८०९ (०९-०४-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखीवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) समूह ग्रामपंचायतीमध्ये नांदा कातकरी पाडा, पारिवला धामणे या गावासह १६ आदिवासी पाडयाचा समावेश असून नांदा कातकरी पाड्यावरील गोरगरीब आदिवासींना प्रत्येकी रु.१२,०००/- प्रमाणे शासनाने शौचालय बांधण्यासाठी अनुदान दिले या अनुदानाच्या रकमेचा लाखीवली समूह ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिवाळीची भेट दिली असे सांगून त्यांनी या आदिवासींना बँकेत नेले आणि त्यांच्या खात्यातून पैसे काढून घेतले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गोरगरीब आदिवासींची फसवणूक करुन त्यांच्या नावावरील अनुदान परस्पर हडप करणे हा गंभीर प्रकार असल्याने या गैरव्यवहाराला जबाबदार असणाऱ्यांवर विनाविलंब कारवाई करण्यात यावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा गंभीर इशारा तेथील ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१२-१०-२०२१) :** (१) होय, या संदर्भात ग्रामपंचायत लाखीवली येथील नांदा कातकरी पाडा येथील ग्रामस्थ यांनी पंचायत समिती भिवंडी येथे तक्रार अर्ज दाखल केला होता.

(२) होय, दिवाळीच्या महिन्यात तक्रारदार ग्रामस्थ यांना शौचालय बांधण्याकरिता ग्रामपंचायत रुपये १२,००० /- देत आहे असे सांगून बँकेत घेऊन गेल्याचा उपरोक्त नमूद तक्रार अर्जात उल्लेख केलेला असून, शासनाने दिवाळी भेट दिली असल्याचा उल्लेख अर्जात नाही.
(३) होय, तक्रार अर्जान्वये अर्जदार यांनी त्यांना शौचालय बांधकामाची उर्वरित रक्कम मिळावी व श्री. बी. बी. जाधव (ग्राम विकास अधिकारी), श्री. विनोद केशव भगली (सरपंच) व श्री. अशीष गुलनाथ पाटील (लिपीक) यांचे विरुद्ध चौकशी व कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.
(४) होय, सदर ग्रामस्थांच्या तक्रार अर्जानुसार पहाणी केली असता तक्रार अर्जातील अर्जदार यांचे नावे रक्कम बँक खात्यातून काढली असून पाहणीचे दिवसापर्यंत संबंधितांकडे शौचालय बांधकाम करणेत आले नव्हते, त्यानुसार संबंधित सरपंच व ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत लाखीवली यांना कारणे दाखवा नोटीस देणेत आली होती.
या संदर्भात संबंधित सरपंच श्री. विनोद केशव भगली यांचे विरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम ३९(१) नुसार कार्यवाही प्रस्तावित करणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.
तसेच, ग्राम विकास अधिकारी श्री. बी. बी. जाधव यांचे विरुद्ध महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (२) मधील तरतुदीनुसार विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील कुटुंबांना यादीच्या आधारे देण्यात आलेल्या घरांचे वाटप योग्य पध्दतीने झाले नसल्याबाबत

**(२) *८५५* (०६-०४-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २००२ ते डिसेंबर, २०१९ पर्यंत मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील कुटुंबांना यादीच्या आधारे देण्यात आलेल्या घरांचे वाटप योग्य पध्दतीने झाले नसल्याने या प्रकरणाचा आढावा घेण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत ४० वर्षापासून, म्हाडाची यादी संपुष्टात न येण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच अद्यापपर्यंत म्हाडाने पुनर्रचित केलेल्या किती इमारतीमध्ये किती अतिरिक्त सदनिका म्हाडास उपलब्ध झालेल्या आहेत व उपलब्ध झालेल्या एकूण अतिरिक्त सदनिकांपैकी, किती सदनिका यादी मधील भाडेकरुंना वितरीत केल्या आहेत, व अद्याप किती सदनिका वितरीत करणे बाकी आहे, तसेच संक्रमण शिबिरात पुनर्विकासामुळे पर्यायी व्यवस्था

म्हणून देण्यात आलेल्या सदनिकांमधील रहिवाश्यांचे पुनर्विकासाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पुनर्विकसीत इमारतींमधील खोल्यांचा ताबा घेतल्यानंतर संक्रमण शिबिरातील किती जागा रिक्त झाल्या आहेत व यादी व्यतिरिक्त किती घुसखोरांनी संक्रमण शिबिरातील जागेत शिरकाव केला आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा येत आहे,

(३) असल्यास, संक्रमण शिबिरात वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांना तातडीने पुनर्विकसीत वा पुनर्रचित इमारतींमध्ये घरे मिळावी यासाठी म्हाडाच्या उपाध्यक्षांनी बृहद् सूचितील (यादी) ९५ रहिवाश्यांना घरे देण्याचे निश्चित करुन नस्तीवर स्वाक्षरी केल्यानंतर सह मुख्यअधिका-यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात अनधिकृतरित्या आणखी ५ नावाचा समावेश केल्या प्रकरणी उपाध्यक्षांकडून करण्यात आलेल्या चौकशीमध्ये सह मुख्याधिकारी दोषी आढळून आल्याचे माहे डिसेंबर २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ९५ रहिवाश्यांची नावे संकेत स्थळावर टाकण्यापूर्वीच १२ रहिवाश्यांना घरांची देयकार पत्रे देण्यात आली असुन या गैरव्यवहारामध्ये मिळकत व्यवस्थापकांचाही समावेश असल्यामुळे या प्रकरणी कारवाई करण्यासाठी म्हाडाच्या उपाध्यक्षांनी गृहनिर्माण विभागाचे अतिरिक्त सचिव यांना पत्र पाठवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जुन्या इमारतींचा पुनर्विकास करताना मुळ इमारतीचे बांधकाम होणार नसल्याने अशा भाडेकरुंची नावे यादीमध्ये समावेश करुन जुन्या रहिवाशांना पुनर्रचित इमारतीमध्ये गाळे देण्यासाठी म्हाडा अधिकारी, कर्मचारी, दलाल यांना पैसे न दिल्यास सदरहू अधिकारी रहिवाशांना सदनिका न देता, अन्य बेकायदा ग्राहकांना परस्पर विक्री करुन कोटयवधीचा आर्थिक गैरव्यवहार करित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार संबंधीत सर्व दोषींवर शासनातर्फे कोणती कडक कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२३-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

म्हाडा प्राधिकरणाचा ठराव क्र.६५२० व ६८२१ मधील तरतूदींच्या अनुषंगाने सन २०१३ ते आजतागायत पर्यंत देकारपत्र न दिलेल्या अर्जदारांची, निष्कासन सूचना दिनांकाच्या जेष्ठतेनुसार गाळा वितरण करणेसाठी, ९५ पात्र गाळेधारांची यादी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाद्वारे तयार करण्यात आली. सदर ९५ पात्र गाळेधारकांना अनुज्ञेय क्षेत्रफळ ३०० चौ.फु. च्या जवळपास असलेले गाळे वितरण प्रस्तावीत करण्यात आले. तद्नंतर सदर यादी म्हाडा संकेतस्थळावर व दैनिक वर्तमानत्रात दावे/आक्षेप/हरकती मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यात आली. सदर यादामधील काही अर्जदारांच्या बाबतीत दावे/आक्षेप/हरकती प्राप्त झाल्या. त्याअनुषंगाने पुनर्पडताळणीचे काम मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामध्ये प्रगतीपथावर आहे.

तसेच, सन २०१२ ते २०१९ या काळात देकारपत्र निर्गमीत केलेल्या तथापि अद्याप ताबा न घेतलेल्या एकूण १४५ गाळेधारकांच्या देकारपत्रास स्थगिती देण्यात आलेली आहे. सदर १४५

गाळेधारकांची यादी म्हाडा संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली. सदर यादीबाबत दावे/आक्षेप/हरकती मागविण्यात आल्या. प्राप्त आक्षेप अर्जांपैकी प्रथम दर्शनी तथ्य आढळून आलेल्या प्रकरणांमध्ये म्हाडाद्वारे सुणावणी घेऊन निर्णय होणेबाबत व इतर प्रकरणांमधील ताबा प्रक्रीया राबविण्याबाबतची उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीधील, धोकादायक म्हणुन जाहिर किंवा इमारतीची संरचनात्मक दुरूस्ती करण्यात येणाऱ्या उपकरप्राप्त इमारतीमध्ये वास्तव्य करीत असलेल्या पात्र भाडेकरू/रहिवाश्यांना संक्रमण शिबीरातील गाळ्यांमध्ये तात्पुरत्या स्वरूपात वितरण करण्यात येते. मुंबई शहर व उपनगरात ३६ विविध ठिकाणी संक्रमण शिबीर असून सदर संक्रमण शिबीरांमध्ये २११४९ इतके गाळे उपलब्ध असून ३० संक्रमण गाळे रिक्त आहेत.

आजपर्यंत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत इमारतींच्या पुनर्विकासातून विकासकांकडून ९२२ अतिरिक्त सदनिका (एन.ओ.सी.गाळे) म्हाडास उपलब्ध झालेले आहेत. त्यापैकी ४२५ सदनिका मास्टर लिस्ट मधील भाडेकरूंना म्हाडाद्वारे वितरीत करण्यात आलेल्या असून सद्यस्थितीत ४९७ सदनिका वितरीत करणे बाकी आहे.

संक्रमण शिबीरातील घुसखोरी ही फार पुर्वीपासुन वेळोवेळी निदर्शनास आली आहे. संक्रमण शिबीरातील घुसखोर/अनधिकृत रहीवाश्यांविरूध्द म्हाडा अधिनियम, १९७६ मधील कलम ९५ (अ) (३) अंतर्गत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने वेळोवेळी कारवाई केलेली आहे. परंतू निष्कासन कारवाई करताना म्हाडाकडील अपुरे मनुष्यबळ, अपुरा पोलीस बंदोबस्त, तसेच शैक्षणिक व धार्मिक कारणावरून निष्कासन मोहिमा स्थगित कराव्या लागणे, स्थानिक राजकिय कार्यकर्ते तसेच स्थानिक जनता कारवाईस विरोध करीत असल्याकरणाने तसेच अनेक रहिवाशी दिवाणी न्यायालयात/मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करून स्थगिती मिळवतात. सदर कारणामुळे निष्कासन मोहिमा पुर्णत: सफल होऊ शकलेल्या नाहीत.

माहे जुलै २०१३ अखेरपर्यंत संक्रमण शिबीरामध्ये ८४४८ अनधिकृत रहिवाशी असल्याचे निदर्शनास आले आहे.

म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील अधिकृत, अपात्र, अनधिकृत भाडेकरू/रहिवाशी यांना पुनर्विकसीत होणाऱ्या संक्रमण शिबीरामध्ये गाळे वाटप करून त्यांचे पुनर्वसन करण्यबाबत शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, दि.१३.०९.२०१९ नुसार अ, ब व क वर्गवारी करून रहिवाशांचे पुनर्विकसित होणाऱ्या संक्रमण शिबीरात पुनर्वसन करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

श्री.अविनाश गोटे, तत्कालीन सहमुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, हे प्राथमीक चौकशीमध्ये दोषी आढळूण आल्यामुळे त्यांची प्रतिनियुक्ती दि.०१.०२.२०२० रोजी रदद करण्यात आली व त्यांच्या सेवा मुळ विभाग म्हणजेच ग्राम विकास विभागास परत करण्यात आल्या आहेत. त्यांनी म्हाडा उपाध्यक्षांच्या आदेशात फेरफार करून बृहतसुचीत अनधिकृत नावे जोडल्याबाबत शिस्तभंगाचा प्रस्ताव म्हाडाद्वारा शासनास सादर करण्यात आला असून त्यांचेवर दोषारोप बजावयाची कार्यवाही सुरू आहे.

तसेच, सदर प्रकरणी अर्जदारांची नावे संकेतस्थळावर टाकण्यापुर्वी प्राधिकरणाचा ठराव क्र. ६५२० च्या तरतूदीचे उल्लंघन करून संकेतस्थळावर यादी प्रसिध्द करण्याआधी १२ देकारपत्रे देण्यात आली. सदर १२ देकारपत्रे निर्गमीत करण्यात जे अधिकारी/कर्मचारी दोषी आढळूण आले त्यांच्याविरूध्द प्रकरणनिहाय म्हाडाद्वारे चौकशी सुरू आहे.

(५) हे, खरे नाही.

उपकर प्राप्त इमारतीतील मुळ रहिवाशी यांना प्राधिकरणाच्या ठराव क्र. ६५२० व ६८२१ मधिल तरतूदीनुसार बृहतसुची समिती मार्फत गाळे वितरण करण्यात येतात.
(६) संबंधित सर्व दोषींविरूध्द चौकशीची कार्यवाही सुरू आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुदवडी (ता. मावळ, जि पुणे) येथील ग्रामपंचायत दप्तर तपासणीमध्ये आढळून आलेली अनियमितता**

**(३) २३४८ (११-०४-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सुदवडी (ता. मावळ, जि. पुणे) येथील ग्रामपंचायत दप्तराची, विकासकामाची, ग्रामपंचायतीने खरेदी केलेल्या वस्तूंची, ग्रामविकास गट विकास अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून नियमितपणे तपासणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीमध्ये अनियमितता, गैरव्यवहार, कागदपत्रे गहाळ होणे, कागदपत्रांमध्ये खाडाखोड असणे, बनावट देयके ग्रामपंचायतीच्या रेकॉर्डमध्ये असणे, तसेच कागदपत्रांमध्ये संशयास्पद खाडाखोड असणे इत्यादीबाबी ग्रामपंचायतीच्या तपासणीमध्ये आढळून आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१२-१०-२०२१) :** (१) होय, गटविकास अधिकारी पंचायत समिती मावळ यांनी दि.२७/१२/२०१९ रोजी व विस्तार अधिकारी यांनी दि.११/०५/२०१८ रोजी सदर ग्रामपंचायतीची तपासणी केली आहे.
(२) नाही, सदर ग्रामपंचायतीची तपासणी केली असता अनियमितता व भ्रष्टाचार झालेचे आढळून आले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे महागाव (कसबा), (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथील ग्रामपंचायतीत झालेला गैरव्यवहार**

**(४) २५३८ (१२-०४-२०२०). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे महागाव (कसबा) (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथील ग्रामपंचायतीत सरपंच, उपसरपंच व सचिवांनी विविध कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार ग्रामस्थांनी जिल्हाधिका-यांकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महागाव कसबा ही दारव्हा तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत असून सरपंच महिला असल्याने उपसरपंच त्यांच्या कामकाजात हस्तक्षेप करतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सरपंच, उपसरपंच व सचिव हे ग्रामपंचायतीची सभा न घेता, बेकायदेशीर कार्यवृत्त लिहिणे, खोटया स्वाक्ष-या करणे, खोटे ठराव पारित करणे, वित्तीय गैरव्यवहार करणे, सचिव गावात उपस्थित न राहणे, ग्रामस्थांनी माहिती मागितल्यास न देणे, दस्तावेज उपलब्ध करुन न देणे, उपसरपंच रेकॉर्डमध्ये खाडाखोड करुन रेकॉर्ड बदलविणे, बनावट रेकॉर्ड तयार करणे इत्यादी तक्रारी ग्रामस्थांनी यापुर्वीही जिल्हाधिका-यांकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१२-१०-२०२१) :** (१) होय, खरे आहे .

(२) हे खरे नाही. सदर ग्रामपंचायतच्या महिला सरपंच या दर महिन्याच्या मासिक सभेला व ग्रामसभेला उपस्थित राहतात व सदर सभांनुसार ग्रामपंचायतचे कामकाज होते.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्नच उदभवत नाही .गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दारव्हा यांच्या मार्फत नियुक्त चौकशी समितीला चौकशी दरम्यान सदर ग्रामपंचायत येथील रेकॉर्ड मध्ये खाडाखोड अथवा बनावट रेकॉर्ड केल्याचे आढळून आले नाही. सबब, सरपंच, उपसरपंच व सचिव यांचेवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

### चंद्रपूर शहरातील वाढत्या प्रदुषणावर आळा घालण्याबाबत

**(५) २७८३ (०६-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील वाढत्या प्रदुषणावर आळा घालण्याबाबत वि.स.स. बल्लारपूर यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दि. २२ नोव्हेंबर, २०१९, दि. २९ नोव्हेंबर, २०१९, दि. ६ नोव्हेंबर, २०१९, दि.१३ डिसेंबर, २०१९ आणि दि.२० डिसेंबर, २०१९ रोजी एफईएस गर्ल्स हायस्कूलच्या विद्यार्थीनीनी बैठा सत्याग्रह करुन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (०८-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) चंद्रपूर शहर व परिसरातील हवा प्रदूषण नियंत्रित करण्याकरिता कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुलुंड पश्चिम येथील टी.ऐन.ए रेडीमिक्स इंडिया प्रा. ली. या कंपनीने नियमबाह्यरित्या रेडीमिक्स कॉँक्रीट प्लांट सुरु केल्याबाबत**

**(६) ३३९७ (०७-०४-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड पश्चिम न. भू. क्र ५१४, ५३१ येथे टी. ऐन. ए रेडीमिक्स इंडिया प्रा. ली. या कंपनीने अटीशर्तीचे उल्लंघन करुन रेडीमिक्स प्लांट सुरु केला असल्याने प्रकल्पाची परवानगी रद्द करण्याची मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०८-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मे.टी.ऐन.ए रेडीमिक्स इंडिया प्रा. ली. या उद्योगाच्या केलेल्या पाहणी दरम्यान सदरील उद्योगाकडून संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने सदरील उद्योगास दि. १८/०२/२०२० रोजी उत्पादन बंद करण्याचे आदेश पारीत केलेले होते.
• तद्नंतर, प्रकल्प धारकाने आढळलेल्या त्रुटींची पुर्तता करून प्रकल्प चालू करण्यासाठी दि.२४/०२/२०२० रोजी विनंती अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर कला होता. सदरील विनंती अर्जाच्या अनुषंगाने दि.१३/०३/२०२० रोजी केलेल्या पाहणी दरम्यान उद्योगाने आढळलेल्या त्रुटीची पुर्तता केल्याचे आढळून आल्याने सदर प्रकल्पास अटी व शर्तीच्या अधिन राहुन उत्पादन प्रकिया चालू करण्याचे आदेश दि.२९/०५/२०२० रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पारीत करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ नगरपालिकेतील सात ग्रामपंचायतींच्या निधीत झालेला गैरव्यवहार**

**(७) ४५९७ (१२-०४-२०२०). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ नगर पालिकेला लागून असलेल्या सात ग्रामपंचायतीचे विलीनीकरणाची अधिसूचना दिनांक २२ जानेवारी २०१६ रोजी निर्गमित झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २२ जानेवारी २०२० रोजी विलीनिकरण झालेल्या सात ग्रामपंचायतीला ४ वर्ष पुर्ण झाले असून ग्रामपंचायत अस्तित्वात असताना प्राप्त निधी आणि खर्चीत निधीचा हिशोब लागत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर परस्पर ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड नगर पालिकेला हस्तांतरण करुन ग्रामपंचायतीच्या खात्यातून कुठल्याही प्रकारचा खर्च अपेक्षीत नसताना तत्कालीन सचिवाने ग्रामपंचायतीच्या खात्यातून पैसे काढून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामपंचायतीच्या खात्यातील निधी कशा पध्दतीने खर्च करावयाचा हयाबाबत ग्रामविकास विभागाकडे रितसर मार्गदर्शन मागवणे गरजेचे असताना सुध्दा तत्कालीन पंचायतसमितीच्या गटविकास अधिका-यांनी मार्गदर्शन मागविले नाही, जिल्हा परिषद प्रशासनाकडून वारंवार विचारणा करुन पंचायत समितीने कुठल्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नाही, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्नुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१२-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे .

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही, गट विकास अधिकारी, यवतमाळ यांचे आदेश दि. २२.०१.२०१६ (ग्रामपंचायत सचिवांना प्राप्त दि. ०२.०२.२०१६ अन्वये, संबंधित ग्रामपंचायत सचिवांना प्रभार हस्तांतरणाबाबतचे आदेश देण्यात आले. त्यानुसार प्रभार हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात आली .मात्र, ग्रामपंचायत वडगाव, उमरसरा व लोहारा येथील ग्रामपंचायत सचिवांनी नगर परिषदेस प्रभार हस्तांतरण केल्यानंतर बँक खात्यातून खाते उताऱ्यानुसार रक्कम काढलेली निदर्शनास आली. परंतु, सदर व्यवहार हे दि. २२.०१.२०१६ रोजीच्या धनादेशाद्वारे रक्कम अदा केल्याचे आढळते.

(४) हे खरे आहे, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यवतमाळ यांनी मार्गदर्शन मागविल्याची नोंद नाही. तसेच, संबंधित माहितीचे संपूर्ण दस्ताऐवज नगर परिषद, यवतमाळ यांचे ताब्यात असल्याने व नगर परिषद, यवतमाळ ने माहिती न दिल्यामुळे जिल्हा परिषद, यवतमाळ प्रशासनास माहिती पुरविता आली नाही.

(५) जिल्हा परिषद, यवतमाळ स्थायी समितीच्या आदेशान्वये चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे व समिती मार्फत चौकशी सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग उभारण्याबाबत

**(८) ५९०९ (०९-०४-२०२०). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात मोठया प्रमाणावर उत्पादीत होणा-या सीताफळ, अंजीर, डाळींब या फळांना योग्य बाजारपेठ मिळत नसल्यामुळे फळ उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फळ उत्पादक शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी साखर कारखाने किंवा दूध संघाच्या धर्तीवर तालुका तसेच जिल्हा पातळीवर तसेच फूड पार्कच्या माध्यमातून सहकारी तत्त्वावर फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग पुरंदर तालुक्यात उभारणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पुरंदर तालुक्यात फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) १. मुख्यमंत्री (कृषि व अन्नप्रकिया) योजनेमार्फत पुरंदर तालुक्यातून एकूण ७ प्रस्ताव प्राप्त झाले होते त्यापैकी २ प्रस्तावांना तत्वतः मान्यता देण्यात आलेली आहे. एका उद्योगाला अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.
२. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये सहकारी तत्वावर सहा फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योगांची उभारणी व अनुदान अदायगी करण्यात आलेली आहे. सन २०१९-२० मध्ये पुरंदर तालुक्यातून १२ प्राथमिक फळप्रक्रिया युनीट, सहा पूर्वशीतकरन व शितगृह, ९ पॅक हाऊस व १ रायपनींग चेंबर उभारणी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी २ प्रस्तावांना ईरादा पत्र देण्यात आलेले आहेत.
३. गट शेती योजनेअंतर्गत सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये एकूण दोन गटांना अनुदान मंजूर केलेले असून त्यांचे मार्फत ऑईल मील, शीतगृह, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग राबविण्यात येत आहेत.
४. आत्मा योजनेअंतर्गत एकूण ७ गट स्थापन करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत भाजीपाला फळउत्पादन व प्रक्रिया युनीट चालू आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शीव (मुंबई) येथील लोकमान्य टिळक रुग्णालयाच्या परिसरात 'मेट्रो ब्लड बँक' सुरु करण्याबाबत

**(९) ६३०१ (०६-०४-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शीव (मुंबई) येथील लोकमान्य टिळक रुग्णालयाच्या परिसरात 'मेट्रो ब्लड बँक' सुरु करण्याचा प्रस्ताव सन २००९ पासून प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेकदा मुंबई शहराच्या काही रुग्णालयांमध्ये रक्ताची उपलब्धता नसते, तर काही रुग्णालयांमध्ये रक्त मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने रक्ताच्या साठ्याचे योग्य नियोजन करण्यासाठी मेट्रो ब्लड बँकेची नितांत आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे लोकमान्य टिळक रुग्णालय परिसरात मेट्रो ब्लड बँक सुरु करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२१) :** (१) भारताच्या मुंबई, दिल्ली, कलकत्ता व मद्रास या चार मुख्य शहरांमध्ये "मेट्रो ब्लड बँक" सुरु करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाचा आहे.

तसेच, मुंबईत "मेट्रो ब्लड बँक" सुरु करण्यासाठी शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात काही जागा राखून ठेवण्यात आली होती. सदर जागा एड्स नियंत्रण सोसायटीच्या ताब्यात देण्यात आली आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई शहर व उपनगरांत शासनाच्या ५, महानगरपालिकेच्या ८ व सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्वावर महानगरपालिका रुग्णालयांत ३ अशा एकूण १६ रक्तपेढ्या कार्यरत आहेत.

महानगरपालिकेच्या रक्तपेढ्यांमध्ये रक्त साठवणूक करण्याची क्षमता योग्य व पुरेशी आहे.

महानगरपालिका रुग्णालयांतील रक्तपेढ्यांमधील रक्ताचा साठा वाढविण्याकरिता महानगरपालिकेच्या रुग्णालयांमार्फत दरमहा अंदाजे १० ते १५ रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते.

तसेच, रक्ताची कमतरता भासल्यास राज्य रक्त संक्रमण परिषद व शासकीय धोरणानुसार, शासकीय व निमशासकीय रक्तपेढ्यांमध्ये योग्य तो सुसंवाद साधू अतिरिक्त/अपुरा/दुर्मिळ रक्ताची विनामूल्य देवाणघेवाण करण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) मेट्रो ब्लड बँक सुरु करण्याची कार्यवाही केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाने करावयाची आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**पंचायत समिती, आर्णी (जि.यवतमाळ) येथील गटशिक्षणाधिकारी,**
**यांनी नियमबाहय केलेल्या शिक्षकांच्या बदल्यांबाबत**

**(१०) ७३४७ (१६-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि यवतमाळ) येथील गटशिक्षणाधिकारी यांनी सन २०१७ मध्ये प.स. आर्णी येथे कार्यरत असतांना मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांनी बदलीचे कोणतेही अधिकार दिले नसतांना कोणतीही परवानगी न घेता बदल्यांच्या स्वरूपात शिक्षकांच्या प्रतिनियुक्त्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेत रिक्तपदे असतांना त्या शाळेतील शिक्षकांच्या बदल्या इतर शाळेत केल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बदल्या हया बदल्यांचे अधिकार नसताना नियमबाहय केल्याप्रकरणाची चौकशी करण्यात आली होती त्या चौकशीचे अहवाल संचालक, अमरावती यांना सादर केला असल्याचे दिनाक १२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशीत काय आढळुन आले, तदनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) जिथे शिक्षकांची गरज आहे अशाच ठिकाणी कमी पटसंख्या असलेल्या शाळेवरील शिक्षक अध्यापन कार्य करण्यासाठी तात्पुरती व्यवस्था करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नोकर भरतीमध्ये झालेली अनियमितता**

**(११) ११८६९ (१५-०७-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत केलेल्या ४६४ पदाच्या भरतीत अनियमितता झाल्याची बाब मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बँकेत भरती करण्यात आलेली बहुतेक मुले सीईओच्या भागातील असून, त्यांचा स्वत:चा मुलगा अपात्र असतांना देखील त्याचा भरतीप्रक्रियेत समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सीईओवर कोणतीही कारवाई करण्यासंदर्भात सहकार आयुक्ताकडे तक्रार केली असून नाशिकच्या सहनिबंधकानी सीईओ यांना दोषी ठरवून ५ मार्च पर्यंत निर्णय घेण्याचे बँकेला कळवूनही सदर बाबत अद्यापही सीईओंवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, याप्रकारणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (३०-०९-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अहमदनगर या बँकेच्या नोकर भरतीच्या अनुषंगाने श्री.टिळक भोस, जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, अहमदनगर, मु.पो.तांदळी दु., ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांचेकडील माहे डिसेंबर २०१९ व जानेवारी २०२० व फेब्रुवारी २०२० या कालावधीत विविध तक्रार अर्ज हे विभागीय सहनिबंधक, नाशिक कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

(२) नाही.

(३) व (४) अंशतः खरे आहे.

भरती प्रक्रिया योग्य रितीने व नियमानुसार पार पाडली जाते किंवा नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची असल्याचे व त्यांनी जबाबदारी पार न पाडल्याचे नमूद करुन विभागीय सहनिबंधक, नाशिक कार्यालयाकडील दिनांक २८/०२/२०१८ रोजीचे पत्राने बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई करणेबाबत बँकस्तरावर तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना बँकेस देण्यात आलेल्या होत्या.

त्यानुषंगाने बँकेने दिनांक ०३/०३/२०२० रोजीच्या पत्राने विभागीय सहनिबंधक कार्यालयास कळविले आहे की, मे.न्यायालयीन आदेश दि.५/४/२०१९ व फेर चौकशीतील दि.१६/१२/२०१९ रोजीचे पत्रात भरती प्रक्रियेव्यतिरीक्त इतर कोणतीही कार्यवाही करणेबाबतचा उल्लेख नाही. तसेच श्री.वर्पे (मुख्य कार्यकारी अधिकारी) यांनी बँकेच्या संचालक मंडळाने भरतीबाबत वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केलेली असून कोणताही कसूर केलेला नसल्याने व त्यामुळे त्यांचेवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्याची आवश्यकता नसल्याचे बँकेच्या दि.२८/२/२०२० रोजीचे संचालक मंडळ सभेतील ठरावान्वये ठरले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व भत्ते देण्याबाबत**

**(१२) १३६९२ (११-०९-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात करोना महामारीचे संकट असून राज्यातील ग्रामपंचायत कर्मचारी हे स्थानिक स्तरावर अहोरात्र काम करत असून ग्रामपंचायतीना मिळणाऱ्या विविध प्रकारचा कर व इतर महसुली आवक संपूर्णत: थांबले असून ग्रामपंचायतींकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध नसल्याने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायतीमार्फत मिळणारे वेतन व राहणीमान भत्ता प्रलंबीत असल्याचे माहे मे २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतन आणि भत्ते हे १४ वा वित्त आयोगामार्फत देण्यात यावे याबाबत विविध ग्रामपंचायत कर्मचारी संघटनाने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व भत्ते हे ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०१-१०-२०२१) :**(१) अंशत: हे खरे आहे,

कोरोना महामारीच्या काळात ग्रामपंचायत कर्मचारी स्थानिक स्तरावर अहोरात्र काम करत आहेत. निधीच्या कमतरतेमुळे कर्मचा-यांचे वेतन /भत्ते प्रलंबित असल्याबाबतचे प्रस्ताव या कार्यासनास प्राप्त झालेले नाहीत.

(२) हे खरे नाही,

(३) १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने १४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीचा वापर ग्रामपंचायत स्तरावर केला जातो.१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीचा विनियोग पायाभूत सुविधांवर करावयाचा आहे. सदर निधीचा वापर आस्थापना विषयक बाबींवर करण्याबाबत मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद नसल्याकारणाने तसेच १४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीपैकी प्रशासकीय कामांसाठीचा १०% निधी वापराच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये सदर १०% निधी

खर्चाच्या नकारात्मक यादीमध्ये ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या (कायम स्वरूपी/कॉन्ट्रक्ट) पगाराचाही समावेश असल्यामुळे ग्रामपंचायत कर्मचा-यांचे थकीत वेतन-भत्ते १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून देण्याबाबत शासन स्तरावरून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ऑनलाईन शिक्षणाद्वारे फसवणूक होत असल्याबाबत

**(१३) १३७३५ (१३-०९-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शाळां ऑनलाईन शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थांना महागडे टॅब देत असून पालकांना आर्थिक भुर्दंड पडत असल्याचे माहे जून २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास शासनाकडून ऑनलाईन शिक्षणाचा क्लास राबवला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
विद्यार्थ्यांना सह्याद्री, जिओ टिव्ही, गुगल क्लासरूम, मुंबई महानगरपालिकेच्या यु-ट्युब चॅनेल्स व झुम ॲपद्वारे ऑनलाईन शिक्षणाची सुविधा पुरविण्यात आली आहे. तसेच, offline/ प्रत्यक्षरीत्या community classes चालविण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील १ नोव्हेंबर २००५ पूर्वी खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाबाबत काढलेली अधिसूचना रद्द करणेबाबत

**(१४) १४३९५ (१९-१०-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त केलेल्या फक्त खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाच्या विरोधात काढलेली अधिसूचना रद्द करून तसेच अभ्यास गट समितीने अहवाल जाहीर करून जुनी पेन्शन योजना जाहीर/लागू करण्याची लेखी मागणी लोकप्रतिनिधी, विविध शिक्षक व शिक्षकेतर संघटना व नागरिक यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री, शालेय शिक्षण, राज्यमंत्री यांच्याकडे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अभ्यास गट समितीचा अहवाल अद्याप सादर करण्यात आला नसताना दिनांक १० जुलै, २०२० रोजी शालेय शिक्षण विभागाने भूतलक्षी प्रभावाने लागू करण्यासाठी अधिनियम मसुदा अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील अधिसूचनेतील सुधारित अधिनियमाची चुकीच्या पद्धतीने अंमलबजावणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०९-२०२१):** (१) सदर विषयाबाबत संघटनेकडून मागणी करण्यात येते.
(२), (३) व (४) वित्त विभागाने दि. ३१/१०/२००५ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू केली आहे. मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयात दि.०१/११/२००५ किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अशंदान निवृत्तीवेतन योजनेची कार्यपध्दती शासन निर्णय, शा.शि.व क्री.वि., दि.२९/११/२०१० अन्वये विहित केली आहे. या शासन निर्णयाविरुध्द दाखल झालेल्या विविध रिट याचिकांवर मा.उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने निर्णय देऊन हा शासन निर्णय ग्राह्य ठरविला आहे. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचेकडे दि. २६/०६/२०२० रोजी झालेल्या बैठकीतील निदेशानुसार अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त समिती दिनांक २४ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली. संयुक्त समितीने दि. ०३ जुलै, २०२० रोजी अहवाल शासनास सादर केला आहे. त्यातील शिफारशीवर कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम, १९८१ च्या नियम १९ मध्ये सुधारणेबाबत हरकती व सूचनासंदर्भात दि.१०/०७/२०२० ची अधिसूचना प्रसिध्द केली होती. सदर अधिसूचना दि.११/१२/२०२० अन्वये मागे घेतली असल्याने नियम १९ मध्ये सुधारणा झालेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मे. सुभद्राज एज्युकेशनल सोसायटी, पुणे या संस्थेस माध्यमिक शाळेकरिता नियमबाह्यरित्या देण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या क्षेत्राचे हस्तांतरण रद्द करणेबाबत

**(१५) १५९०६ (२५-११-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका विकास योजनेतील गाव मौजे चिखली येथील गट नं ७२ पै, गट नं ९० पै, गट नं ९४ पै, या भूखंडावर महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षण क्र. १ / १३३ एकूण क्षेत्र १८ हजार चौ.मी पैकी माध्यमिक शाळेकरिता महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले क्षेत्र ४७५४ चौ.मी एफएसआय टीडीआरच्या बदल्यात ताब्यात घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महानगरपालिकेच्या ताब्यात असलेला भूखंड मे.सुभद्राज एज्युकेशनल सोसायटी, पुणे या संस्थेस अत्यल्प दराने तीस वर्षाच्या भाडेपट्टी दराने देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरक्षणाच्या संपूर्ण क्षेत्राची जागा तीस वर्षाच्या कालावधीसाठी लीज दराने भाडे तत्वावर देण्याबाबत निविदा मागविली असता तीन निविदा धारकांपैकी दोन निविदाधारक अपात्र ठरून निविदा रकमेपेक्षा ०.५० % जास्त दर असलेल्या मे. सुभद्राज एज्युकेशनल सोसायटी, पुणे या संस्थेस महानगरपालिकेचे अधिकारी यांनी सदर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत आर्थिक संगनमताने नियमबाह्यरित्या हस्तांतरित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एकच निविदा असल्याने फेर निविदा न मागविता महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने सदर मोक्याच्या जागी महानगरपालिकेचा असलेला भूखंड तीस वर्षाकरिता भाडेतत्वावर बाजार भावापेक्षा अत्यंत अल्पदराने फक्त २,५२,७४,४०३/- या रकमेने देण्यात आला असल्याने महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर गाव मौजे चिखली येथील गट नं ७२ पै, गट नं ९० पै, गट नं ९४ पै, या भूखंडापैकी माध्यमिक शाळेकरिता महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले क्षेत्र ४७५४ चौ.मी भूखंडचे मे.सुभद्राज एज्युकेशनल सोसायटी, पुणे या संस्थेस केलेल्या हस्तांतरणाची उच्चस्तरीय चौकशी करून सदर हस्तांतरण रद्द करणेबाबत चिंचवड वि.स.स.यांनी लेखी पत्राद्वारे आयुक्त पिंपरी- चिंचवड महानगरपालिका, (दि.२७.८.२०२० रोजी) प्रधान सचिव-१, नगरविकास विभाग (दि १९.१०.२०२०) नगरविकास मंत्री यांच्याकडे ई-मेलद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर भूखंड हस्तांतराची उच्चस्तरीय चौकशी करून वितरीत करण्यात आलेले भूखंड वाटप रद्द करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच सदर प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करून त्यांच्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-१०-२०२१) :** (१) होय.

(२) होय,

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर भूखंडासाठी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी २ निविदाधारक कागदपत्रांची / अटी शर्तीची पूर्तता करत नसल्याने अपात्र ठरविण्यात आले.

निविदेकरिता सदर जागेचे दर नगर रचना विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचे मार्फत निर्धारित करण्यात येतात. मे. सुभद्राज एज्युकेशनल सोसायटीचे दर नगर रचना विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी निर्धारित केलेल्या दरापेक्षा जास्त असल्याने स्थायी समितीच्या दिनांक २८.०२.२०१८ च्या ठरावान्वये मान्यता घेऊन सदर जागा सोसायटीस हस्तांतरीत केली असल्याचे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) होय.

(६) व (७) या प्रकरणी अतिरीक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करणेत आलेली असून चौकशीअंती उचित निर्णय घेण्यात येईल, असे आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

---

## राज्यातील ७० लाख विद्यार्थी शाळाबाह्य होत असल्याबाबत

**(१६) १६१४१ (२६-११-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनामुळे ऑनलाईन शिक्षणात येत असलेल्या विविध अडचणींमुळे पहिली ते

बारावीपर्यंतच्या वर्गातील सुमारे ४० टक्के म्हणजेच ७० लाख विद्यार्थी या वर्षी शाळाबाह्य होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना महामारीमुळे राज्यातील बहुतेक शाळा बंद असून ऑनलाईन वर्गाशी संबंधित सुमारे ४० टक्के म्हणजेच ७० लाखाहून अधिक विद्यार्थ्यांचे स्मार्ट टी.व्ही अथवा मोबाईल नसल्याचे सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शिक्षकांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण तसेच वीज उपलब्ध नसल्याने ऑनलाईन वर्गापासून विद्यार्थी संपर्कात राहत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही. याबाबतचे कोणतेही अधिकृत सर्वेक्षण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) जिथे ऑनलाईन सुविधा उपलब्ध नाही तिथे इतर offline मार्गाने शिक्षण सुरू ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, उदा. TV / radio मार्फत वर्ग, उघड्यावर / समाज मंदिर इ. ठिकाणी किंवा शाळांच्या प्रांगणात किंवा वरांड्यावर वर्ग आयोजित करणे, गावातील सुशिक्षित तरुण, स्वयंसेवक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य "शिक्षक मित्र" बनून मुलांना शिक्षण देत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गडगा (ता.नायगाव, जि.नांदेड) येथे स्वच्छ भारत मिशन योजनेअंतर्गत शौचालयाच्या अनुदानाच्या रकमेत झालेला अपहार**

**(१७) १९५२३ (२४-११-२०२०). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गडगा (ता.नायगाव, जि.नांदेड) येथे स्वच्छ भारत मिशन योजनेअंतर्गत शौचालयाच्या बांधकाम अनुदानातील लाखो रुपयांचा सरपंच व ग्रामसेवक यांनी गटविकास अधीकारी यांच्या संगनमताने अपहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या गावात चौकशी समीतीव्दारे लाभार्थीनीहाय शौचालयांबाबत चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (२४-०९-२०२१) :**(१) ग्रामपंचयायत मौजे-गडगा, तालुका-नायगांव, जिल्हा-नांदेड अंतर्गत सन २०१८-१९ या वर्षामध्ये, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) योजनेत भ्रष्टाचार झाल्याबाबत, माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये, जिल्हा परिषद, नांदेड यांना तक्रार प्राप्त झाली होती.

(२) ग्रामपंचायत मौजे-गडगा, तालुका-नायगांव, जिल्हा-नांदेड अंतर्गत स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) योजनेमध्ये सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या कालावधीत अपहार झाल्याचे निदर्शनास आलेले होते. त्यानुषंगाने संबंधित श्री.एस.व्ही.कौसल्ये, श्री.एम.एम.शेख व

श्री.डी.एस.केते ग्रामसेवकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, संबंधितांकडून घडलेल्या अनियमिततांच्या अनुषंगाने संबंधितांच्या विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. सन २०१८-१९ या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचा अपहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ओबीसी समाजाच्या परीक्षार्थींसाठी 'महाज्योती' संस्थेस मदत मिळण्याबाबत**

**(१८) २०३७० (१५-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सारथी आणि बार्टीच्या धर्तीवर इतर मागासवर्गीय स्पर्धा परीक्षार्थींना प्रशिक्षण व आर्थिक मदतीसाठी महाज्योती संस्थेची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पूर्व परीक्षेच्या निकालात राज्यातील अनेक ओबीसी विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेच्या दर्जेदार प्रशिक्षण व आर्थिक मदतीसाठी शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या महाज्योती संस्थेस अद्याप कोणताही निधी उपलब्ध झाला नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन महाज्योती संस्थेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (०१-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

दि. ८ ऑगस्ट २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिबा फुले व संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) स्थापना करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही,

महाज्योती या संस्थेस सन २०२०-२१ या कालावधी करीता रु. ३५.५० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

तर सन २०२१-२२ या कालावधीसाठी रु. १४८.०० कोटीची तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आली असून त्यापैकी रु. १४.८० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**कोपरगाव शहरातील पाणी वितरण व्यवस्थेच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत**

**(१९) २७१३९ (२०-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि. अहमदनगर) शहरात पाणी वितरण करणारी व्यवस्था जुनी झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत असल्याने नगारिकांना पाणी टंचाईस सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी गळती थांबविण्यासाठी पाणी वितरण व्यवस्थेची दुरुस्ती करणे गरजेचे असून त्यासाठी निधी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२१) :** (१) (२) व (३) कोपरगाव नगरपरिषदेमार्फत साठवण तलावाचे काम,वितरणव्यवस्था बळकटीकरण करण्याच्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला असून सद्यस्थितीस मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग नाशिक यांच्याकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

• सदर प्रकल्पास तांत्रिक मान्यतेअंती नगर परिषद प्रशासन संचालनालय मार्फत सदर प्रकल्पाबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकल्प निधीच्या उपलब्धतेनुसार शासनस्तरावर विचारात घेण्यात येईल.

---

**पुणे महामार्गावरील कात्रज नविन बोगदा ते नवले पूल दरम्यानच्या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(२०) २७१९२ (१८-०६-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-बंगळूर (जि.पुणे) महामार्गावरील कात्रज नविन बोगदा ते नवले पूल दरम्यानचा रस्ता 'डेथ झोन' झाला असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, हा मार्ग प्रचंड रहदारीचा असून दिनांक ६ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास याच मार्गावर झालेल्या भीषण अपघातामध्ये एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून ५ जण जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महामार्गावरील कात्रज नवीन बोगदा ते नवले पूल बाह्यवळणावरील तीव्र उतार, सेवा रस्त्यांचे अपूर्ण काम, सूचना फलक, बायफ्रेन रोप सारख्या अनेक समस्यांमुळे हा मार्ग धोकादायक बनला असून या मार्गावर वर्षभरात झालेल्या सुमारे ३९ अपघातांमध्ये २० निष्पाप नागरिकांचा मृत्यु झाला असून ३४ जण जखमी झाले असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासनाच्या तांत्रिक चुकांमुळे हे प्रकार वारंवार घडत असून वाढते अपघात रोखण्यासाठी लोकप्रतिनिधीकडुन वेळोवेळी बैठका, पत्रव्यवहार, आंदोलने करुन देखील कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती चौकशी केली आहे, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने अपघात रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही, असे प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

पुणे-बंगळूर (जि.पुणे) महामार्गावरील कात्रज नविन बोगदा ते नवले पूल दरम्यानचा रस्ता केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येतो.

(२) दिनांक ६ ऑक्टोबर, २०२० रोजी कात्रज चौक ते नवले पूल दरम्यान भरधाव गाडी चालविण्यामुळे अपघात घडला आहे. सदर अपघाताबाबतच्या FIR नुसार या अपघातात एका दुचाकी स्वाराचा मृत्यू झाला असून काही जण जखमी झाले आहेत, हे खरे आहे.

(३) (४) व (५) कात्रज नवीन बोगदा ते नवले पूल दरम्यानचा रस्ता धोकादायक नसून सदर ठिकाणी आयआरसीच्या विनिर्देशानुसार अनुज्ञेय मर्यादेत उतरता Gradient आहे.

अशा उतरत्या ग्रेडियंटवर जड वाहनांचे चालक कधीकधी इंधन वाचवण्यासाठी Neutral Gear वर सुमारे ८० ते ९० किमी प्रति तास वेगाने वाहन चालवत असल्यामुळे वाहन चालकांना वाहनावर नियंत्रण ठेवणे कठीण होऊन सदरचे अपघात घडले असल्याचे निदर्शनास येते.

सदर ठिकाणी सेव्ह लाइफ फाऊंडेशन, स्थानिक प्रशासन, आरटीओ, वाहतूक पोलीस आणि भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या शिफारशीनुसार, अतिरिक्त सुरक्षा उपाय म्हणून सावधगिरीने वाहने चालविण्यासाठी आवश्यक सूचना फलक, स्पीड मर्यादा फलक, ब्लिंकर्स, कॅट आय, रंबल स्ट्रिप्स लावण्यात आले आहेत, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विरार (जि.पालघर) येथील विजय वल्लभ या खासगी रुग्णालयातील वातानुकूलित यंत्राचा स्फोट होऊन रुग्णांचा झालेला मृत्यू**

**(२१) २७१९८ (१२-०६-२०२१). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (जि.पालघर) येथील विजय वल्लभ या खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात वातानुकूलित यंत्रातील कॉम्प्रेसरचा स्फोट झाल्याने लागलेल्या भीषण आगीत १५ रुग्णांचा होरपळून मृत्यू झाल्याची बाब दिनांक २४ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रूग्णालयातील अतिदक्षता विभागामध्ये कार्यरत असलेल्या मध्यवर्ती वातानुकूलित यंत्रणेतून गरम वाफा येत असल्याने सदर प्रकरणी नातेवाईकांनी रुग्णालयातील प्रशासनाला कळविले असता देखील त्याकडे दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयामध्ये लागलेल्या आगीतील मृतांमध्ये ५ महिला व १० पुरुषांचा समावेश असून, या रुग्णालयाचे मागील सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी पासून इलेक्ट्रिक ऑडिटच झाले नसल्याचेही निदर्शनास आल्यानंतर या रुग्णालयात आपत्कालीन व्यवस्था देखील उपलब्ध नसल्याचे प्राथमिक चौकशीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार रुग्णालयातील संबधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१) व (२) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात दिनांक २३.०४.२०२१ रोजी पहाटे ०३.१५ च्या सुमारास विजयवल्लभ या खाजगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात वातानुकूलित यंत्रणेमध्ये लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत १५ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. ही वस्तुस्थिती आहे.

सदर दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर विजयवल्लभ या संपूर्णत: खाजगी रुग्णालयाच्या प्रशासनाविरुध्द हलगर्जीपणा व निष्काळजीपणाबाबत वसई-विरार शहर महानगरपालिकेने अर्नाळा पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला असून पुढील कारवाई पोलिस विभागामार्फत सुरु आहे.

(३) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विजयवल्लभ या खाजगी रुग्णालयात दिनांक २३.०४.२०२१ रोजी झालेल्या आगीच्या दुर्घटनेत ५ महिला व १० पुरुषांचा समावेश असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

उपरोक्त दुर्घटनेच्या अनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिकेने खालील बाबी कळविल्या आहेत:-

सदरचे रुग्णालय हे संपूर्णत: खाजगी व व्यावसायीक स्वरुपाचे असल्याने तेथील विद्युत वापराबाबत परवानगी देण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास आहे. तसेच विद्युत यंत्रणा सुस्थितीत ठेवणे व त्याअनुषंगाने नुतनीकरणाची प्रक्रिया करणे ही संपूर्णपणे संबंधित आस्थापनेची जवाबदारी आहे.

महाराष्ट्र राज्य आग प्रतिबंधक व जीवनसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००(६) कलम (३) अन्वये आवश्यक ते उपाययोजना करण्याची व सदैव सुस्थितीत सुसज्ज ठेवण्याची जवाबदारी संबंधित इमारत मालक व भोगवटादार यांची असते.

अग्निशमन व्यवस्था यंत्रणेचे परीक्षण करण्यात आले असून त्याद्वारे सदर इमारतीस सन २०१४ मध्ये नाहरकत दाखला देण्यात आलेला आहे. तसेच सदर इमारतीतील अग्निशमन यंत्रणेची प्रत्यक्ष पाहणी करुन माहे मार्च, २०२० मध्ये अग्निशमन विषयक बाबींकरीता दाखल महानगरपालिकेने प्रदान केला आहे.

(४) व (५) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विजयवल्लभ या रुग्णालयातील दुर्घटनेबाबत महानगरपालिका व शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-

सदरच्या दुर्घटनेची चौकशीकरीता शासनामार्फत जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विजयवल्लभ या खाजगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात दिनांक २३.०४.२०२१ रोजी झालेल्या दुर्घटनेबाबतचा चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला.

सदर अहवालामध्ये उपरोक्त दुर्घटनेच्या अनुषंगाने रुग्णालय व्यवस्थापन यांचा निष्काळजीपणा, तसेच रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागातील तांत्रिक व मनुष्यबळाच्या त्रुटी, दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची भूमीका, समन्वयाचा व पर्यवेक्षिय अभाव इत्यादीबाबत भाष्य करण्यात आले आहे.

सदर दुर्घटनेस कारणीभूत विजयवल्लभ रुग्णालयांच्या व्यवस्थापकांविरुध्द पोलिस विभागामार्फत सध्या कारवाई सुरु आहे.

दरम्यान वसई विरार शहर महानगरपालिकेने या दुर्घटनेत मृत्यूमूखी पडलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना प्रत्येकी रु. ५ लाख व जखमी व्यक्तिंना प्रत्येकी रु.५०,००० आर्थिक मदत जाहिर करण्यात आली आहे.

तसेच शासनाने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून सदर दुर्घटनेमध्ये मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांच्या कुटूंबीयांना प्रत्येकी रु.५ लाख तसेच ज्या रुग्णांना दुखापत झाली आहे त्यांना रु.१ लाख इतकी आर्थिक मदत जाहिर केली आहे.

---

**कोकण व रायगड जिल्हयात तौक्ते चक्रीवादळामुळे झालेले नुकसान**

**(२२) २७२१९ (१५-०६-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), अॅड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात विशेषत: पालघर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे व रायगड या जिल्हयात झालेल्या तौक्ते, चक्रीवादळामुळे समुद्र किनारपट्टी भागातील फळबागायतदार, शेतकरी, मच्छीमार, शाळा, घरे, झाडे, रस्ते, शेतजमिनी व वाऱ्यामुळे वीजेच्या खांबांचे नुकसान झाले असून वीज पुरवठाही खंडीत झाला होता, याध्मध्ये ११ पेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाला असून अनेकजण जखमी झाले असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणातील नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत काय तसेच किती जिल्ह्यातील नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम पूर्ण झाले असून अद्याप पर्यंत किती जिल्ह्यात पंचनामे करण्याची कामे अपूर्ण आहेत,

(३) असल्यास, उक्त सर्वेक्षणानुसार शेतकरी, मच्छिमार व स्थानिक रहिवाश्यांचे एकूण किती नुकसान झाले आहे व त्यानुषंगाने नुकसानग्रस्तांसाठी केंद्र व राज्य शासनातर्फे किती निधी मंजूर करण्यात आला आहे, नुकसानग्रस्तांना व मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना शासनाने तातडीने किती आर्थिक मदत केली आहे व किती नुकसानग्रस्त अद्याप लाभापासून वंचित आहेत,

(४) असल्यास, तौक्ते चक्रीवादळामुळे मच्छिमारांच्या झालेल्या नुकसानीपोटी पीएमएमएसवाय (पंतप्रधान मत्स संपदा योजना) योजनेंतर्गत तसेच फयान व निसर्ग चक्रीवादळातील महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयाच्या धर्तीवर तौक्ते चक्रीवादळातील नुकसानग्रस्त मच्छिमारांना विशेषबाब म्हणून अधिकाधिक मदत करण्याचा प्रस्ताव मत्स्यव्यवसाय विकासाचे प्रादेशिक उपायुक्त यांनी मत्स्यव्यवसाय आयुक्त यांच्याकडे पाठविला आहे काय,

(५) असल्यास, तौक्ते चक्रीवादळाग्रस्तांना २५० कोटी रुपये इतके पॅकेज देण्याच्या निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्याबाबतचा निर्णय लवकर निर्गमित करण्यांत येईल असे मदत व पुनर्वसन मंत्री महोदयांनी जाहीर केले असल्याचे दिनांक २६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्यांत आला आहे काय, असल्यास त्यांचे स्वरुप काय आहेत व कधीपर्यंत नुकसानग्रस्तांना प्रत्यक्ष मदत मिळणार आहे,

(६) असल्यास, तौक्ते चक्रीवादळामुळे झालेले नुकसान पहाता नुकसानग्रस्तांना शासनाने जाहीर केलेली आर्थिक मदत ही तुटपुंजी असून ती वाढवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) उक्त प्रकरणी अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (३०-०९-२०२१) :** (१) होय खरे आहे,

(२) व (३) "तौक्ते" चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीबाबत बाधित जिल्हयातील पंचनामे करण्यात आले आहेत. त्यानुसार बाधितांना वाटप करण्यासाठी शासन निर्णय, दि.२३.०६.२०२१ अन्वये रू.१७०७२.७३ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तर "तौक्ते" चक्रीवादळामुळे मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटूंबियांना रू.३८८.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) "तौक्ते" चक्रीवादळामुळे मच्छिमारांच्या झालेल्या नुकसानीपोटी "निसर्ग" चक्रीवादळामध्ये देण्यात आलेल्या दरानुसार मच्छिमारांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार शासन निर्णय, दि.२३.०६.२०२१ अन्वये रू.१२३७.७५ लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

(५) सदर घटनेसाठी "निसर्ग" चक्रीवादळामध्ये देण्यात आलेल्या दरानुसार "तौक्ते" चक्रीवादळातील बाधित व्यक्तींना मदत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या दि.२७.०५.२०२१ रोजी झालेल्या बठैकीमध्ये घेण्यात आला आहे. त्यानुसार "तौक्ते" चक्रीवादळामुळे झालेल्या

नुकसानीकरिता एकूण रू.१७०७२.७३ लक्ष इतका निधी शासन निर्णय, दि.२३.०६.२०२१ अन्वये वितरीत करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील डॉ.झाकीर हुसेन कोवीड रुग्णालयात ऑक्सीजन गळती होऊन रुग्णांचा झालेला मृत्यू**

**(२३) २७२६६ (१२-०६-२०२१). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना),श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ),श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील डॉ.झाकीर हुसेन कोवीड रुग्णालयातील टाकीत ऑक्सीजन भरतांना ऑक्सीजन गळती लागल्याने कोरोनाग्रस्त २२ रुग्णांचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक २१ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ऑक्सीजन वायु गळतीप्रकरणी चौकशी करण्यासाठी शासनाने तेथील विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली ७ सदस्यांची उच्चस्तरीय समिती नेमली असल्याचे तसेच नाशिक महानगर पालिकेने महापालिका स्तरावर देखील चौकशी करण्याचा निर्णय घेतला असल्याचे व त्याचबरोबर नाशिक पोलिस आयुक्तालयातील सहाय्यक पोलिस आयुक्तांमार्फत या प्रकरणाचा तपास करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत अहवालात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने राज्यात पुन्हा असे प्रकार घडू नये याकरीता सर्व रुग्णालयांचे ऑक्सीजन ऑडिट करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर घटनेत मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१०-२०२१) :** (१) होय.

नाशिक महानगरपालिकेच्या डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयात दि.२१.०४.२०२१ रोजी ऑक्सीजन टाकीच्या गळतीची दुर्घटना झाली होती. यावेळी रुग्णालयात दाखल असलेल्या एकूण १५७ कोव्हीड बाधीत रुग्णांपैकी २२ रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

(२) व (३) सदर दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी शासनामार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती.

• विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दि.०२.०५.२०२१ अन्वये समितीचा अहवाल शासनास सादर केला आहे.

• भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून मानक कार्यप्रणाली बाबत समितीने अहवालात केलेल्या शिफारशीनुसार सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दि.१५.०६.२०२१ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

• नाशिक महानगरपालिकेचे ऑक्सीजन सिलेंडरचे पुरवठादार ठेकेदार यांचेविरुध्द आर्थिक दंडात्मक कार्यवाही आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

• या प्रकरणी चौकशी करण्यासाठी शासनस्तरावरुन उच्चस्तरीय समिती नेमली असल्याने नाशिक महानगरपालिकेने स्वतंत्र चौकशी केली नाही.

• तसेच, राज्यातील उपलब्ध ऑक्सीजन प्रणाली/यंत्रणा यांची देखभाल दुरुस्ती व कार्यवहन करण्याकरिता आरोग्य सेवा आयुक्तालयाने दि.०८.०७.२०२१ च्या पत्रान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त केले असून, त्यांचे अधिनस्त असलेला विभाग हा त्याकरीता नोडल विभाग म्हणून घोषित करण्यात आला आहे. तसेच आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत ऑक्सीजन प्रणाली/यंत्रणा करीता मार्गदर्शक सूचना दि.२२.०७.२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

• सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत भद्रकाली पोलीस स्टेशन, नाशिक येथे दि.२२.०४.२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) सदर दुर्घटनेमध्ये दुर्दैवी मृत्यू झालेल्या २२ रुग्णांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधुन प्रत्येकी रु.५ लक्ष व नाशिक महानगरपालिकेमार्फत प्रत्येकी रु.५ लक्ष याप्रमाणे आर्थिक मदत जाहिर करण्यात आली आहे. त्यापैकी २० रुग्णांचे वारसांना प्रत्यक्ष रक्कम अदा करण्यात आली आहे. उर्वरित ०२ मयत रुग्णांचे वारस निश्चित झाले असून त्यांना देखील वरीलप्रमाणे रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शौचालय बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(२४) २७३०० (१८-०६-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सर्वांसाठी स्वच्छतागृह या अभियानाच्या शौचालय बांधकामात गैरव्यवहार झाला असल्याचे सन २०२०-२०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या समवेत दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीत मागविलेल्या माहितीनुसार सह महानगरपालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांच्याकडून दिनांक १४ ऑक्टोबर, २०२०

रोजीच्या पत्रामधून प्राप्त माहितीनूसार महानगरपालिकेने सन २०१४ ते २०१९ मध्ये वा त्या दरम्यान ४७४७८ वैयक्तिक शौचालये बांधली असून, सदर केलेल्या बांधकामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदारावर व दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०१४ ते २०१९ मध्ये वा त्यादरम्यान ४७४७८ वैयक्तिक शौचालय बांधले असून सदर बांधकामामध्ये कोणताही गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंब्रा (जि. ठाणे) येथील प्राईम क्रिटीकेअर रुग्णालयाला आग लागून ४ रुग्णांचा झालेला मृत्यू**

**(२५) २७३०५ (१३-०६-२०२१). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा (जि. ठाणे) येथील प्राईम क्रिटीकेअर रुग्णालयाला आग लागून ४ रुग्णांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेनंतर खबरदारी म्हणून शहरातील सर्व रुग्णालयांचे अग्निशामक तपासणी (FIRE AUDIT) करण्याचे आदेश अग्निशमन विभागाला दिले असता, जवळजवळ ६५ खाजगी रुग्णालयांनी त्यांच्या रुग्णालयामध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा स्थापित केली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रश्न घटनेत मृत पावलेल्या रुग्णांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत तसेच शासनाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या खाजगी रुग्णालयांवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा येथील प्राईम क्रिटीकेअर रुग्णालयाला दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी आग लागण्याची दुर्घटना घडली होती.

सदर दुर्घटनाग्रस्त रुग्णालयाच्या अतिदक्षता व जनरल वॉर्डमध्ये उपचार घेत असलेल्या रुग्णांना इतर रुग्णालयात स्थलांतरीत करण्यात आले असता स्थलांतरानंतर रुग्णालयात ४

रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील ३४७ रुग्णालयांना फायर ऑडिट करण्याकरीता जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेने नोटीसा बजाविल्या आहेत.

त्यानुसार २७(६) रुग्णालय आस्थापनांना फायर कंप्लायन्स सादर केले असून इतर आस्थापनासंदर्भात कार्यवाही सुरु असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) मुंब्रा येथील या प्राईम क्रिटीकेअर रुग्णालयास दिनांक २८.०४.२०२१ रोजी लागलेल्या आगीच्या दुर्घटनेची चौकशी करण्याकरीता महानगरपालिका स्तरावर गठीत ७ सदस्यीय चौकशी समितीने आगीच्या घटनेची खालील कारणे नमूद केली आहेत:-

* दुर्घटनाग्रस्त रुग्णालयातील विद्युत वितरण व्यवस्थेत विद्युतभार ओवरलोड झाल्याने शॉर्टसर्किट होउन वायरींगमध्ये आग लागली.

* संबंधित रुग्णालयाने विज वितरण कंपनीकडून मंजूर केलेल्या क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेचा विद्युतभार वापरात आणला होता.

* सदर दुर्दैवी घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णांच्या कुंटुंबीयांना रु. ५ लक्ष प्रत्येकी आर्थिक नुकसान भरपाई प्रदान करण्यात आली आहे.

* उपरोक्त चौकशी समितीच्या अहवालास अनुसरून सदर दुर्घटनाग्रस्त रुग्णालय बंद ठेवण्याबाबत ठाणे महानगरपालिकेने आदेश पारित केले आहेत.

* तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रात विविध रुग्णालयाच्या अग्निसुरक्षेच्या उपाययोजना तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या सक्षमीकरण करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

* ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी रुग्णालयाच्या व्यवस्थापकांना उपरोक्त दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर विविध निर्देशाचे पालन करण्याबाबत दिनांक ०९.०(६).२०२१ रोजी आदेश पारित करण्यात आले आहेत.

* सदरची इमारत अनधिकृत असून संबंधितांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोरोना काळात मृत्यू पावलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या वारसांना आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत

**(२६) २७३३३ (१२-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात मुंबई महानगरपालिकेतील ५२ सफाई कामगारांचा मृत्यू झाला असून या कामगारांच्या वारसांना रु. ५० लाख इतके आर्थिक सहाय्य देणार असल्याचे शासनाने घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक वर्ष उलटूनही अद्यापपर्यंत केवळ १४ सफाई कामगारांच्या वारसांना महापालिकेकडून आर्थिक सहाय्य करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मृत ५२ सफाई कामगारांपैकी केवळ १७ सफाई कामगारांच्या वारसांना पी.टी.केस देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सफाई कामगारांच्या वारसांना आर्थिक सहाय्य व पी.टी.केस साठी वारंवार महापालिकेत फेऱ्या माराव्या लागत असून महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून खूपच दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी कोरोना काळात काम केलेल्या सफाई कामगारांच्या वारसांना तातडीने आर्थिक सहाय्य देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपयायोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२१) :** (१) कोरोना काळात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील सफाई कामगारांच्या विविध संवर्गातील ४५ कर्मचारी व आरोग्य विभागातील ८ सफाईगार अशा एकूण ५३ कर्मचाऱ्यांच्या (कंत्राटी कर्मचाऱ्यांसह) मृत्यू झाला आहे.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत, कोविड-१९ च्या रुग्णांची प्रत्यक्ष सेवा करणाऱ्या व त्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात आलेल्या तसेच कोविड-१९ मुळे मृत्यू पावलेल्या आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना रु. ५० लाख विमा योजनेचा लाभ देण्याबाबतचे आदेश केंद्र शासनाकडून पारित करण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.

सफाई कामगार प्रवर्गातील एकूण ५३ कर्मचाऱ्यांच्या (कंत्राटी कर्मचाऱ्यांसह) दाव्यांपैकी ४८ दावे केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत नियुक्त केलेल्या संचालक आरोग्य सेवा, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आले. त्यापैकी,

• ६ दावे केंद्र शासनामार्फत मंजूर करण्यात आले आहेत.
• केंद्र शासनाने नाकारलेल्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सानुग्रह योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या २८ दाव्यांपैकी ११ दावे महानगरपालिकेमार्फत मंजूर करण्यात आले आहेत व १७ दाव्यांवर कार्यवाही सुरु आहे.
• केंद्र शासनाकडे १३ दावे प्रलंबित आहेत.
• १ दावा अपात्र ठरविण्यात आला आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील कोविड-१९ मुळे मृत्यू झालेल्या ३६ कामगारांपैकी २४ कामगारांच्या पात्र वारसांना पी.टी. केस देण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील कोविड-१९ मुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना आर्थिक सहाय्य देण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत:-

• बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सानुग्रह योजनेंतर्गत रुपये ५० लाख देण्यात येतात.
• घन कचरा व्यवस्थापन विभागातील कर्मचाऱ्यांना लागू असणाऱ्या विमा योजनेंतर्गत रुपये १ लाख देण्यात येतात.
• घन कचरा व्यवस्थापन विभागातील कर्मचाऱ्यांचा सेवेत असतांना मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या पात्र वारसांना पी.टी. केसद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोकरी दिली जाते.

• महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकरिता अंत्यविधी तातडीची रु. १५००/- इतकी मदत दिली जाते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात लॉकडाऊन काळात दारिद्रयरेषेखालील शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य वितरण होत नसल्याबाबत**

**(२७) २७३३५ (११-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लॉकडाऊनच्या काळात दारिद्रयरेषेखालील शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला परंतु १५ दिवस उलटूनही अद्याप मोफत धान्य पुरवठा करण्यात आला नसल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान्य वितरणाचे पूर्ण नियोजन न केल्याने दारिद्रयरेषेखालील शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य मिळाले नाही त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दारिद्रयरेषेखालील शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य वितरण करुन यास विलंब करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (२३-०७-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही. कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावास प्रतिबंध व्हावा याकरिता लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर दि. १६.४.२०२१ च्या शासन पत्रान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सवलतीच्या दराने अन्नधान्य मिळण्यास पात्र असलेल्या लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अंत्योदय अन्न योजनेच्या व प्राधान्य कुटूंबातील लाभार्थ्यांना १ महिन्याकरीता मोफत अन्नधान्य वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर पत्रानुसार पात्र लाभार्थ्यांना माहे एप्रिल, २०२१ किंवा माहे मे, २०२१ यापैकी एका महिन्याचे अन्नधान्य मोफत घेण्याचा पर्याय देण्यात आला होता. त्यानुसार लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य वितरीत करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे व नाशिक जिल्हयात आगी लागुन वनसंपदा नष्ट झाल्याबाबत**

**(२८) २७४७५ (१८-०६-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील शहापूर प्रादेशिक विभागाच्या सहा वनपरिक्षेत्रात गत २ महिन्यात ५० वेळा वणवे (आगी) लावल्यामुळे ३० हेक्टरहून अधिक वनसंपदा जळून नष्ट झाली असून, माहे

जानेवारी, २०२० ते एप्रिल, २०२१ या कालावधीत ३०० ठिकाणी आगी लागल्याने २००० हेक्टर हजारो वृक्ष, मौल्यवान वनसंपत्ती व दुर्मिळ पशुपक्षी, सरपटणारे जीव व जनावरांचा चारा आगीत जळून नष्ट झाल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच नाशिक जिल्ह्यातील कळवण, देवळा तालुक्यातील निवाणे, वरवंडी, खर्डे आदी गावांना लागू असलेले काळदरा, पेढा डोंगर, कारट्या डोंगर, भूत डोंगर, तेलदरा, कुरणा डोंगर येथे वारंवार लागणाऱ्या आगीमुळे तेथील वनसंपदा नष्ट झाली असल्याचे माहे मे २०२१ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिकारी टोळयांकडून जंगलात आगी लावण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासन स्तरावर सत्वर चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुषंगाने आगी लावणाऱ्या शिकारी टोळक्याविरुध्द व जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध तात्काळ कारवाई करुन वनसंपत्तीचे रक्षण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (११-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शहापूर वनविभागात एप्रिल व मे २०२१ या महिन्यात मध्ये २३ ठिकाणी वणव्यांच्या घटनांची नोंद झालेली असून १९.५०० हे. क्षेत्रावर वणवा लागलेला आहे. माहे जानेवारी २०२० ते मे २०२१ या दरम्यान शहापूर वनविभागात २८२ वनवणव्यांच्या घटना निदर्शनास आलेल्या आहेत.

सदरचा वणवा हा ग्राऊंड फायर (Ground Fire) या प्रकारातील असून या मध्ये वाळलेले गवत व झाडांचा पानगळ झालेला वाळलेला पाला- पाचोळा जळून नष्ट झालेला आहे. या वनवणव्यामध्ये मौल्यावान वनस्पती, दुर्मिळ पशु पक्षी, सरपटणारे जीव, जळून नष्ट झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

वनक्षेत्र कळवण (प्रा) मधील निवाणे परिसरात आकस्मित वनवणव्याच्या एकुण ६ घटना तसेच वनक्षेत्र देवळा (प्रा) मधील वरवंडी व खर्डे परिसरात आकस्मित वणव्याच्या एकूण ५ घटना घडलेल्या आहेत. त्या बाबत वेळेत आग विझवण्यासाठी दक्षता घेवुन वनकर्मचारी / अधिकारी यांनी वेळेत संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे सदस्य, अध्यक्ष व ग्रामस्थांच्या मदतीने आग विझविण्याचे प्रयत्न करुन वनसंपदा नष्ट होऊ दिली नाही. सदर आगी बाबत नियमानुसार वनगुन्हे नोंदवुन कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर आग आकस्मित लागल्यामुळे वेळेतच विझवून वनसंपदा नष्ट होणार नाही याची दक्षता घेतली आहे. अशा प्रकारच्या वनवणव्यांच्या घटना निदर्शनास येताच तात्काळ अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करुन त्या प्रकरणी गुन्हाची चौकशी वनक्षेत्रपाल यांचेमार्फत करण्यात येते. शिकारी टोळयांकडून वनवणव्यांच्या नावाखाली आगी लावण्याचे प्रकार

निदर्शनास आले नाही त्यामुळे अशा शिकारी टोळयांच्याविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. वनसंपत्तीचे रक्षण करण्याच्या दृष्टीने वन विभागाकडून तात्काळ कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उच्चदाब पारेषण वाहिनी प्रकल्पाचे कंत्राट विनानिविदा अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई इन्फ्रा लिमीटेड कंपनीला दिल्याबाबत

**(२९) २७५०५ (१५-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईला अखंडित वीजपुरवठा करता यावा यासाठी पश्चिम उपनगरातील आरे उपकेंद्रा दरम्यान उच्चदाब पारेषण वाहीनी बसविण्याच्या प्रकल्पाचे सुमारे ७ हजार कोटीचे कंत्राट अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई इन्फ्रा लिमिटेडला देण्याचे आदेश राज्य वीज नियामक आयोगाने निविदा न काढता दिनांक २३ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास प्रकल्पाचा खर्च कमी व्हावा यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याची इतर वीज कपंन्या व तज्ञांनी केलेली आग्रही मागणी वीज आयोगाने अमान्य केल्यामुळे या प्रकल्पाच्या खर्चापोटी मुंबईसह राज्यभरातील वीजग्राहकांवर प्रति युनिट सहा ते सात पैसे अधिक भार पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य वीज नियामक आयोगाने सदरहु कंपनीला उक्त कामाचे कंत्राट विनानिविदा देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२७-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही,

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ही एक अर्ध-न्यायिक संस्था असून सदर आयोगाचे कामकाज विद्युत अधिनियम, २००३ व प्रचलित विनियमांनुसार करण्यात येते.

सध्याच्या परिस्थितीत मुंबई पारेषण वाहिन्यांच्या अपुऱ्या क्षमतेमुळे बाहेरील स्वस्त वीज मुंबईतील ग्राहकांसाठी पारेषित करणे शक्य होत नाही. सदर पारेषण वाहिन्यांच्या अपुऱ्या क्षमतेमुळे मुंबईत उपलब्ध असलेल्या वीजनिर्मात्यांकडून महाग वीज विकत घ्यावी लागते. पारेषण वाहिन्यांची अपुरी क्षमता लक्षात घेऊन विविध समित्यांनी (खापर्डे समिती, झाल्टे समिती, उच्च-स्तरीय समिती इ.) कुडुस उपकेंद्र ते आरे उपकेंद्रा दरम्यान एचव्हीडीसी वाहिनी उभारण्याची शिफारस केली आहे.

मे. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एइएमआयएल) या कंपनीला आयोगाने दिनांक २१.०३.२०२१ रोजीच्या आदेशान्वये पारेषण परवाना प्रदान केलेला आहे.
तसेच एइएमआयएल या कंपनीने एचव्हीडीसी प्रकल्पाचे काम आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक निविदा मागवून करावे, असे आयोगाने आदेश दिलेले आहेत.
आयोगाच्या दि. २१.०३.२०२१ रोजीच्या आदेशाला टाटा पॉवर कंपनीने विद्युत अपिल न्यायाधिकरणामध्ये आव्हान दिले असून सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने एचव्हीडीसी प्रकल्पाच्या खर्चाचे मूल्यांकन करण्यासाठी आयआयटी, मुंबई या संस्थेची नियुक्ती केली आहे. तसेच आयोगाच्या आदेशानुसार प्रकल्पाची उभारणी आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक निविदा मागवून केली जाईल.
या प्रकल्पाच्या खर्चापोटी महाराष्ट्रातील सर्व वीज ग्राहकांवर येणारा अधिभार हा पारेषण दराच्या चौकटीनुसार प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाल्यानंतर पारदर्शकपणे जाहीर सुनावणी घेऊन प्रचलित विनियमांनुसार आकारण्यात येईल.

---

## मासुंदा तलाव (जि.ठाणे) येथे झाड पडून रिक्षाचालकाचा झालेला मृत्यू

**(३०) २७६४५ (१८-०६-२०२१). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरातील रस्त्यालगत व शहरातील अन्य ठिकाणी महापालिका वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत धोकादायक व महाकाय वृक्षांची वर्षातून किमान दोन वेळा छाटणी करण्याचे महापालिका वृक्ष प्राधिकरण विभागास बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे येथील मासुंदा तलावाजवळील वृक्ष छाटणी न केल्यामुळे दिनांक २१ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास वृक्ष पडल्याने रिक्षाचालक व त्यामधील प्रवासी यांचा मृत्यु झाल्याची घटना घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुर्घटनेला वृक्ष प्राधिकरण विभाग व पर्यायाने महानगरपालिका जबाबदार असून मृतांच्या वारसांना प्रत्येकी दहा लाख रुपये आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी मृतांच्या नातेवाईकांनी तसेच महापालिका लोकप्रतिनिधींनी महापालिका प्रशासनाकडे दिनांक २३ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने मृतांच्या वारसांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्याच्या बाजूने लागवड केलेले तसेच शाळा, मंदिर या सार्वजनिक ठिकाणचे वृक्षांची छाटणी करणे वृक्षप्राधिकरणाचे कर्तव्य असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) मासुंदा तलाव जवळील वृक्षांची छाटणी करण्यात आली होती. परंतु रिक्षाचालक व त्यामधील प्रवाशी यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) होय हे खरे आहे.

संबंधित मृतांच्या नातेवाईकांनी व लोकप्रतिनिधींनी आर्थिक मदतीची मागणी केली असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) ठाणे महानगरपालिकेने मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबतच्या निर्णयासाठी कार्यवाही सुरू असल्याचे कळविले आहे.

---

**राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत**

**(३१) २७८२४ (१५-०६-२०२१). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागपूर, अहमदनगर, सातारा, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, ठाणे, नाशिक, वाशिम या जिल्ह्यांसह विदर्भ व खानदेशातील अन्य भागात माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अवकाळी पाऊस, वादळीवारा व गारपीटीमुळे गहू, हरभरा, द्राक्ष, कलिंगड, पपई आदि पिकांचे नुकसान होऊन बाजरी, ज्वारी, केळी या रब्बी पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करुन त्याबाबतचा अहवाल शासनाकडे सादर करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत देण्यात यावी असे अन्न व औषधे प्रशासन मंत्री यांनी दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी माध्यमाद्वारे जाहीर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हानिहाय विविध यंत्रणाकडून नुकसानीचे पंचनामे अहवाल सादर करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (३०-०९-२०२१) :** (१) होय खरे आहे,
(२) व (३) होय
(४) नुकसानग्रस्त शेतकऱ्याना आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील विविध विकासकामांसाठी लागणारी वन विभागाची जाचक अट शिथील करण्याबाबत**

**(३२) २७८३५ (१२-०६-२०२१). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील वन विभागाच्या जाचक अटीमुळे रस्ते व पुलाचे बांधकाम तसेच जिल्ह्यातील इतर विकास कामे विलंबाने होत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्याचे भौगोलीक क्षेत्र मोठे असून अत्यल्प लोकसंख्या असलेले आदिवासी पाडे व गावांना अत्यावश्यक सोयी सुविधा पुरविण्यासाठी रस्ते व पुलांचे बांधकाम नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील रस्ते व पुलाचे बांधकाम होण्यासाठी वन विभागाची जाचक अट शिथिल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गडचिरोली जिल्हयाचा विकास जलदगतीने करण्याकरीता गडचिरोली जिल्ह्यातील वन विभागाची जाचक अट शिथिल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (२९-०९-२०२१) :** (१), (२) व (३) गडचिरोली जिल्ह्यातील सुमारे ७७ % क्षेत्र हे वनक्षेत्र आहे. वनक्षेत्रातून जाणा-या रस्त्यांच्या व पुलांच्या कामांना वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत मंजूरीची आवश्यकता भासते. स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर कायदा रद्य करण्याची / कायद्यातील तरतूदींपासून गडचिरोली जिल्ह्याला सूट देण्याची यापूर्वी मागणी केली आहे.
वनक्षेत्रात वनेतर कामे करण्यासाठी प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाने विहित केलेल्या नमुन्यात प्रस्ताव सादर करणे आवश्यक असते. सदर प्रस्तावास केंद्र / राज्य शासनाची पूर्व परवानगी आवश्यक असते.
रस्त्यांच्या बांधकामासाठी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनक्षेत्र वळतीकरणाचे परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्यासाठी व प्रस्तावांवर जलद गतीने कार्यवाही होण्याच्या दृष्टीने

प्रकल्प यंत्रणा व वन विभाग यांच्यामध्ये तसेच मंत्रालय स्तरावरही संयुक्त बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत.

(४) गडचिरोली जिल्हयातील पायाभूत सुविधांसाठी वनजमीन उपलब्ध होण्यास विलंब टाळण्याच्या दृष्टीने शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अस्तित्वात येण्यापूर्वी म्हणजेच दि.२५.१०.१९८० पूर्वी वनक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचे अस्तित्वातील रूंदीमध्ये डांबरीकरण व अद्ययावतीकरण करण्यास परवानगी देण्याचे अधिकार केंद्र शासनाने राज्य शासनास प्रदान केले आहेत. सदर कामे जलद गतीने होण्यासाठी राज्य शासनाने दि.९.३.२०२१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सदर अधिकार संबंधित मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रा.) यांना दिले आहेत.

रस्ते, कालवे, पारेषण वाहिन्या इ. प्रकारचे एकरेषीय प्रकल्प जलदगतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सक्षम प्राधिकरणाच्या तत्वत: मंजूरी नंतरही आवश्यक अटींची पूर्तता केल्यास अंतिम मान्यतेपूर्वी वन विभागामार्फत झाडे तोडण्याची व काम सुरू करण्याची परवानगी देण्यात येते.

केंद्र शासनाने नक्षल प्रभावित भागात केंद्र किंवा राज्य शासनामार्फत विकसित करण्यात येणा-या शाळा, शैक्षणिक संस्था, दवाखाने, वीज व दूरसंचार तारा, लघु सिंचन कॅनॉल, अपारंपारिक उर्जा स्त्रोत, वीज उपकेंद्रे, सार्वजनिक रस्ते, पोलीस मदत केंद्र अशा प्रकारच्या विविध १४ सार्वजनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ५ हे. च्या मर्यादेत वनजमीन वळतीकरणाचे अधिकार राज्य शासनास प्रदान केले आहेत. तसेच केंद्र किंवा राज्य शासनामार्फत राबविण्यात येणा-या उक्त प्रकल्पांसाठी ५ हे. च्या मर्यादेत वनक्षेत्र आवश्यक असल्यास व प्रति हेक्टरी ५० पेक्षा कमी वृक्षतोड होणार असल्यास पर्यायी वनीकरणातून देखील सूट दिली आहे.

याव्यतिरिक्त अनुसूचित जमाती व इतर परंपरागत रहिवाशी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००(६) च्या कलम ३ (२) अंतर्गत गावाला जोडणा-या नवीन जोड रस्त्याकरीता जर ७५ पेक्षा जास्त वृक्षतोड होणार नसेल तर १ हे. च्या मर्यादेत परवानगी देण्याचे अधिकार संबंधित उपवनसंरक्षक यांना आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे जिल्हयातील मिरा-भाईंदर प्रशासनाने शहरवासियांकडून वसूल केलेली रक्कम पुन्हा त्यांच्या खात्यात वळती करण्याबाबत

**(३३) २७९३८ (१२-०६-२०२१). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात ६०० कोटी खर्च करूनही भुयारी गटार योजना अपूर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना अपूर्ण असल्याने त्यांतर्गत येणारे एस.टी.पी. प्लांटपैकी ७ प्लांट बंद पडलेले असून १ प्लांट बांधण्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम अपूर्ण असल्यामुळे नागरिकांना सदर योजनेचा कोणताही लाभ होत नसतानाही महानगरपालिका प्रशासनाने सन २०११-१२ ते सन २०२०-२१ पर्यंत नागरिकांकडून १२० कोटी रुपये मलप्रवाह सुविधा लाभ कर वसूल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार मिरा-भाईंदर शहरवासियांकडून वसूल केलेली १२० कोटी रुपयांची रक्कम पुन्हा त्यांच्या खात्यात वळती करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२१) :** (१) केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत मिरा भाईंदर शहराकरिता रुपये ४९१.९६ कोटी किंमतीची भूमिगत गटार योजना मंजूर करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर योजनेवर रुपये ३९७.९६ कोटी (भाववाढ वगळून) इतका खर्च झालेला आहे.
• मिरा भाईंदर शहराची भौगोलिक परिस्थिती पाहता मिरा भाईंदर शहराची जमीन भरावाची असल्यामुळे खोदाई करताना जमीन ढासळण्याची तसेच पाणी निचऱ्याचे प्रमाण जास्त प्रमाणात असल्याकारणाने योजना पूर्ण होण्यास विलंब होत असून सद्यस्थितीस सदर प्रकल्पाची भौतिक प्रगती ९७ टक्के झालेली आहे.
(२) मिरा भाईंदर मधील भूमिगत गटार योजनेत १० मलनिस्सारण केंद्राचा समावेश असून त्यापैकी आतापर्यंत ८ मलनिस्सारण केंद्रे कार्यान्वित झालेली असून उर्वरित २ मलनिस्सारण केंद्राचे काम प्रगतीपथावर असून ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम १२९ (बब) नुसार मलप्रवाह सुविधा लाभ कर लागू करण्याची तरतूद आहे.
• त्या अनुषंगाने सदर प्रकल्पातील भांडवल निर्माण करणे, कर्जाचे हप्ते भरणे, प्रकल्प निधीच्या उभारणीकरिता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दिनांक १५.०२.२०११ रोजीच्या विशेष महासभेतील ठराव क्रमांक ९४ अन्वये सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून सर्व मालमत्तांना करयोग्य मूल्यांच्या ८ टक्के प्रमाणे मलप्रवाह सुविधा लाभ कर आकारण्यात आलेला आहे.
• सन २०११-१२ ते २०२०-२१ पर्यंत रुपये १४०.२१ कोटी मलप्रवाह सुविधा लाभकर वसुल करण्यात आलेला आहे.
(४) व (५) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रकल्प निर्मितीसाठी निधीची आवश्यकता असते. त्यासाठी मलसुविधा लाभ कर मालमत्ता धारकास लागू करणे आवश्यक आहे.
• सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेंतर्गत भुयारी गटार योजना राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाकरिता एकूण ५० टक्के निधी महानगरपालिकेने उभा करावयाचा आहे. या दृष्टीने भांडवल निर्मिती करणे, कर्जाचे हप्ते भरणे, प्रकल्प निर्मिती करिता निधीची आवश्यकता आहे. त्यामुळे सदरची रक्कम पुन्हा शहरवासियांच्या खात्यात वळती करता येत नाही.

---

## पोंभुर्णा तालुक्यातील जुनगांव ते गंगापूर या रस्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(३४) २८११२ (१८-०६-२०२१). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) येथील जुनगांव ते गंगापूर या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत लोकप्रतिनिधी बल्लारपूर यांनी मा. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना दिनांक १४ एप्रिल, २०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने काय निष्पन्न झाले व यावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०१-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे. लेखी निवेदन प्राप्त झाले.
(२) व (३) मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या प्रचलित धोरणानुसार, सदर रस्त्याच्या आतापर्यंत झालेल्या कामाची तपासणी राज्य गुणवत्ता निरिक्षकाद्वारे करण्यात आलेली असून केलेल्या कामाबाबतचा शेरा समाधानकारक आहे. प्रगतीपथावरील सदर कामाच्या पुढील कामाची गुणवत्तासुद्धा राज्य गुणवत्ता निरिक्षकामार्फत तपासणी करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा तालुक्यातील जंगल परिसरात वारंवार वणवे लागण्याचे प्रकार वाढत असल्याबाबत**

**(३५) २८४६४ (१२-०६-२०२१). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि. ठाणे) तालुक्याला २४ हजार हेक्टर क्षेत्र असलेले जंगल लाभले आहे या जंगलाची व्यवस्थित राखण होण्यासाठी वाडा पूर्व, वाडा पश्चिम व कंचाड असे तीन स्वतंत्र विभाग असतानाही सध्या जंगल परिसरात वारंवार वणवे लागण्याचे प्रकार वाढत असून या वणव्यात जंगलातील वन संपदाचे आगीमध्ये भक्षस्थानी पडत असल्याच्या घटना माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जंगलातील ससे, रानडुक्कर व इतर प्राण्याच्या शिकारीसाठी व चोरटी जंगल तोड करणारे तस्करींसाठी आगी लावत असून आजपर्यन्त याबाबत एकही गुन्हा दाखल झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) वन विभागाच्या हद्दीत दरवर्षी वारंवार आगी लावण्याचे प्रकार घडत असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रारी करुनही वनसंपत्तीचे रक्षण करण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे व चौकशीच्या अनुषंगाने काय निष्पन्न झाले तसेच दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (११-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
शहापूर वनविभागात एप्रिल व मे २०२१ या महिन्यात मध्ये २३ ठिकाणी वणव्यांच्या घटनांची नोंद झालेली असून १९.५०० हे. क्षेत्रावर वणवा लागलेला आहे. माहे जानेवारी २०२० ते मे २०२१ या दरम्यान शहापूर वनविभागात २८२ वनवणव्यांच्या घटना निदर्शनास आलेल्या आहेत.

सदरचा वणवा हा ग्राऊंड फायर (Ground Fire) या प्रकारातील असून या मध्ये वाळलेले गवत व झाडांचा पानगळ झालेला वाळलेला पाला- पाचोळा जळून नष्ट झालेला आहे. या वनवणव्यामध्ये मौल्यावान वनस्पती, दुर्मिळ पशु पक्षी, सरपटणारे जीव, जळून नष्ट झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
वनक्षेत्र कळवण (प्रा) मधील निवाणे परिसरात आकस्मित वनवणव्याच्या एकुण ६ घटना तसेच वनक्षेत्र देवळा (प्रा) मधील वरवंडी व खर्डे परिसरात आकस्मित वणव्याच्या एकूण

५ घटना घडलेल्या आहेत. त्या बाबत वेळेत आग विझवण्यासाठी दक्षता घेवुन वनकर्मचारी / अधिकारी यांनी वेळेत संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे सदस्य, अध्यक्ष व ग्रामस्थांच्या मदतीने आग विझविण्याचे प्रयत्न करुन वनसंपदा नष्ट होऊ दिली नाही. सदर आगी बाबत नियमानुसार वनगुन्हे नोंदवुन कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर आग आकस्मित लागल्यामुळे वेळेतच विझवून वनसंपदा नष्ट होणार नाही याची दक्षता घेतली आहे. अशा प्रकारच्या वनवणव्यांच्या घटना निदर्शनास येताच तात्काळ अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करुन त्या प्रकरणी गुन्हाची चौकशी वनक्षेत्रपाल यांचेमार्फत करण्यात येते. शिकारी टोळयांकडून वनवणव्यांच्या नावाखाली आगी लावण्याचे प्रकार निदर्शनास आले नाही त्यामुळे अशा शिकारी टोळयांच्याविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.
वनसंपत्तीचे रक्षण करण्याच्या दृष्टीने वन विभागाकडून तात्काळ कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मनमाड (जि.नाशिक) शहराला पाणी पुरवठा करणा-या वागदर्डी धरणाची गळती थांबविण्याबाबत

**(३६) २८५१५ (१५-०६-२०२१). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (जि.नाशिक) शहराला पाणी पुरवठा करणा-या वागदर्डी धरणाच्या भिंतीतून व मुख्य जलवाहिनीतून मोठया प्रमाणात गळती होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील नागरीकांना माहे मार्च, २०२१ पासून १३ ते १४ दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणातून होणारी गळती बंद करुन पाण्याचा अपव्यय थांबवावा अशी मागणी नागरीकांसह विविध संघटनांनकडून संबंधित विभागाकडे वारंवार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने पाण्याचा अपव्यय थांबविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०९-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) मनमाड शहरातील मुख्य जलवाहिनीवरील गळती नगरपरिषदेमार्फत खाजगी ठेकेदाराकडून वेळोवेळी बंद करण्याची कार्यवाही केली जाते.
मोठ्या प्रमाणावर असलेली पाण्याची गळती बंद करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही नगरपरिषदेकडून सुरु आहे.
ज्या मुख्य जलवाहिनीवर गळतीचे प्रमाण अधिक आहे, अशी मुख्य जलवाहिनी बदलून नविन टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास तांत्रिक मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

सन २०२०-२१ मध्ये अधिक्षक अभियंता, धरण समिती, नाशिक यांच्यामार्फत वागदर्डी धरणाची पाहणी करुन धरणाच्या सांडव्याची गळती बंद करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे निदेश दिलेले आहेत.

मनमाड नगरपरिषदेने सदरहू कामाचे रु.२.०० कोटी किंमतीचे ढोबळ अंदाजपत्रक तयार केले असून, त्यास तांत्रिक मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

टंचाई काळात पिण्याच्या पाण्याच्या गळतीसंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने, तथा पाण्याचा अपव्यय थांबविण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेमार्फत आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत मुख्य जलवाहिनीवरील गळती अंशतः बंद करण्यात आलेली असून, त्यानुसार नविन पाईप लाईन टाकण्याचे काम नगरपरिषदेमार्फत प्रस्तावित असल्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी अहवाल सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोरेगाव पूर्व (मुंबई) येथील नेस्को कोरोना केंद्रात साहित्य खरेदी मध्ये झालेली अनियमितता

**(३७) २८६०४ (१८-०६-२०२१). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना कालावधीत स्थायी समितीच्या बैठका रद्द झाल्यामुळे उपायुक्त व सहायक आयुक्तांना कोरोना कालावधीत खर्च करण्याचा अधिकार दिला असल्याची बाब माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कालावधीत मुंबई महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी याचा फायदा उचलत गोरेगाव पूर्व येथील नेस्को सेंटर मधील कोरोना केंद्राकरीता दोन हजार खाटांकरीता विनानिविदा कोटयवधी रुपयाचे कंत्राट दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये कोरोना केंद्रामधील वैद्यकीय सेवा वगळून साहित्याचा पुरवठा करण्यासाठी पालिकेने सुरुवातीला १०० खाटांसाठी दोन कंत्राटदारांना ४४ लाख २९ हजार रुपयाला दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यानंतर दोन हजार खाटांसाठी साहित्य पुरवठा करण्यासाठी एका कंत्राटदाराला १० कोटी ८९ लाख ७७ हजार इतक्या रुपयाचे कंत्राट दिले असून, वरील दोन्ही वेळा दिलेल्या कंत्राटात मोठी तफावत असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी झालेल्या गैरप्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका स्थायी समितीच्या दिनांक १७.०३.२०२० अन्वये उपायुक्त यांना

रु. १ ते ५ कोटी व सहायक आयुक्त यांना रु. २५ लाखापर्यंत कोरोना कालावधीत खर्च करण्याचे अधिकार देण्यात आले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे नाही.

कोविड-१९ च्या सुरुवातीच्या काळात तातडीने व सक्षमपणे पुरवठा करु शकणाऱ्या पुरवठादाराबरोबर सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजुरीने एम.ओ.यु. करुन विविध सेवा पुरविण्यासाठी कंत्राट दिले होते.
(३) कोविड-१९ च्या सुरुवातीच्या काळात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून एक कंत्राटदाराला अंदाजे रु. ४४.२४ लाख रुपयांचे कंत्राट दरपत्रके मागवून देण्यात आले होते.

सदर कामाचा अंतिम खर्च अंदाजे रु. २९.२३ लाख इतका झालेला आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) दोन हजार खाटांसाठी साहित्य पुरवठा करण्यासाठी एका कंत्राटदाराला अंदाजित रु. १०.८९ कोटी इतक्या रकमेचे कंत्राट दिले होते. परंतु पुरवठा करण्यात आलेल्या विविध सुविधांचा खर्च रु. ६.५६ कोटी इतका झाला आहे.

तसेच कामाचा खर्च त्याच्या व्याप्तीप्रमाणे झाला असून, दोन्ही कंत्राटात तफावत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) व (६) सदर बाब लागू नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## राज्यामध्ये मंजुर करण्यात येत असलेल्या रोजगार हमी योजनेतील कामांच्या निकषांमध्ये बदल करण्याबाबत

**(३८) २८७४० (०९-०६-२०२१). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये सध्या कोविड या महामारीच्या प्रादुर्भावामुळे सर्व सामान्य जनता तसेच मोल मजुरी करणाऱ्या मजुरांची आर्थिक टंचाईमुळे उपासमार होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यामध्ये मंजुर करण्यात येत असलेली रोजगार हमी योजनेची कामेही प्रति गावांमध्ये ठराविकच कामे मंजुर करण्याचे आदेश शासनाकडून निर्गमित झालेले आहेत तसेच रोजगार हमी योजनेची कामांची संख्याही गावातील लोकसंख्येवर आधारित नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी मोठ्या गावात लोकसंख्या जास्त असताना व लहान गावात लोकसंख्या कमी असताना देखील केवळ दोन किंवा तीनच कामे मंजुर करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रोजगार हमी योजनाच्या कामांचे निकष काय असुन त्यामध्ये आवश्यक बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. संदीपानराव भुमरे (२८-०९-२०२१) :** (१), (२) व ३) हे खरे नाही.
(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही मागणीप्रधान योजना असून कामाच्या मागणीनुसार मजुराला काम पुरवले जाते. त्यासाठी कामाचा पंचायत व यंत्रणास्तरावर शेल्फ ठेवण्यात येतो. केंद्र शासनाद्वारे अनुज्ञेय असलेल्या २६२ प्रकारच्या कामांच्या यादीत समाविष्ट असलेली कामे घेता येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील मे.टोरंटो कंपनीने भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे भूईभाडे थकविले असल्याबाबत**

**(३९) २८८०० (१३-०६-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मे.टोरंटो कंपनी ही खाजगी वीज पुरवठा कंपनी भिवंडी-निजामपुर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना वीजपुरवठा करीत असून त्याकरिता सदरहू कंपनीस उक्त महानगरपालिकेच्या हद्दीतील जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कंपनीने उक्त जागेचे सन २००७-२००८ ते २०१८-२०१९ या कालावधीतील जवळपास ७२ कोटी रूपयांचे भुईभाडे महानगरपालिकेला जमा न केल्याने, दंडनीय व्याजासह जवळपास २१४ कोटी रूपयांचा भरणा महानगरपालिकेकडे करण्याबाबत माहे जुन, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सदरहू कंपनीस नोटीस पाठविली व तद्नंतर कंपनीने उक्त रकमेचा भरणा न केल्याने माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सदरहू कंपनीला जप्तीची नोटीस पाठविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भूईभाडयाची रक्कम भरण्याबाबत महानगरपालिकेने कंपनीला माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान नोटीस पाठविली असता नगरविकास विभागाचे तत्कालिन उपसचिव यांनी या नोटीसीला लगेचच स्थगिती दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कंपनीने सन २००७ पासून कंपनीच्या वार्षिक नफ्याच्या २ टक्के रक्कम ही सीएसआर निधीत जमा केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त कंपनीकडून वसूल करावयाची जवळपास २१४ कोटी रूपयांची रक्कम वसूल न करण्याचा निर्णय तत्कालिन मंत्रीमंडळाने माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान घेतला, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार सदरहू दंडाची रक्कम संबंधित कंपनीकडून व्याजासह वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व मे. टोरंट पॉवर कंपनी यांच्यातील करारानुसार महानगरपालिका क्षेत्रात मे. टोरंट पॉवर यांच्यामार्फत दिनांक २६.०१.२००७ पासून विद्‌युत वितरण करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

याकरीता महाराष्ट्र विद्‌युत कंपनी यांच्याकडील महानगरपालिका क्षेत्रातील वितरण व्यवस्था ज्यात इमारती, पोल, ट्रान्सफार्मर भुमीगत केबल इत्यादी मे. टोरंट पावर यांना उपलब्ध करण्यात आले आहे.

(२) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने मे. टोरंट पावर कंपनी यांना सन २००७-०८ ते सन २०१८-१९ या कालावधीतील भूईभाडे व मालमत्ता करापोटी रु. ७१.३७ कोटी व दंडनिय व्याजापोटी रु. २१३.६६ अशी एकूण २८५.०४ कोटी इतक्या रकमेच्या वसूलीकरीता महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम, कराधान नियम ३९ च्या तरतुदीनुसार दिनांक १५.०६.२०१८ रोजी वसूली नोटीस तसेच कराधान नियम ४२ अन्वये जंगम/स्थावर मालमत्ता अटकावणी करुन जप्तीचे आदेश दिनांक ३०.०८.२०१८ रोजी बजावले आहे.

(३) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने मे. टोरंट पॉवर कंपनी विरुध्द अटकावणीची कारवाई केल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील रहीवाश्यांना देण्यात येणाऱ्या विद्युत सेवेत खंड पडण्याची शक्यता असल्याचे प्रतिपादन करुन शासनास हस्तक्षेप करण्याची विनंती मे. टोरंट पॉवर कंपनीने शासनास केली होती.

तद्नुषंगाने दिनांक १०.०३.२०१७ रोजी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी मे. टोरंट पॉवर कंपनी विरुध्द केलेल्या अटकावणीच्या कारवाईस ७ दिवसांकरीता शासनाने स्थगिती दिली ही वस्तुस्थिती आहे.

(४) दिनांक ०८.०३.२०१९ च्या पत्रान्वये तत्कालीन महापौर, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी मे. टोरंट पॉवर कंपनी मार्फत सन २००७ पासून सीएसआर हाती निव्वळ नफ्याच्या दोन टक्के रक्कम जमा केलेली नाही. यास्तव, सदर कंपनी कर माफीस पात्र नसल्याचे शासनास निवेदन सादर केले आहे.

तथापि, मे. टोरंट पॉवर कंपनी लि. यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार आर्थिक वर्ष सन २०१४-१५ ते २०२०-२१ या कालावधीत कंपनीच्या नफ्यावर दोन टक्के सी.एस.आर. रक्कम रु. १२०.१८ कोटी असून वास्तविक सी.एस.आर. खर्च रु. १२८.८२ कोटी इतका आहे.

(५) व (६) राज्य मंत्रीमंडळाने दिनांक २९.११.२०१८ च्या बैठकीत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी महावितरण कंपनीची फ्रेंचायझी मे. टोरंट पॉवर कंपनीवर वितरण रोहित्र, एलटी पोल, एचटी पोल, भूमीगत वाहिन्या यावर सन २००७-०८ ते सन २०१८-१९ या कालावधीतील रु. २८५.०८ कोटी मालमत्ता कर भरण्याबाबतची नोटीस रद्दबातल अथवा निरर्ह करण्यास मंजूरी प्रदान केली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

त्याकरीता नगर विकास विभागाकडून याबाबत विशेष अधिसूचना निर्गमित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. सदरच्या मान्यतेस अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५१ (३) अन्वये मे. टोरंट पॉवर कंपनी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत बजावण्यात आलेली रु. २८५.०४ कोटी इतक्या रकमेची वसूली नोटीस दिनांक २७.०५.२०१९ रोजी अंतीमत: रद्द करण्यात आली.

दरम्यान सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयात सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयात शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या**

**(४०) २९०८२ (१५-०६-२०२१). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्यानंतरही नापिकी नैसर्गिक आपत्ती व अन्य कारणांमुळे शेती पिकांचे नुकसान झाल्यामुळे माहे जानेवारी ते मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जानेवारी, ते मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मराठवाड्यातील औरंगाबाद ४२, जालना १५, परभणीत २१, हिंगोलीत ७, नांदेड २८, बीड ४९, लातूर १४ तर उस्माबनाबाद २६ या जिल्ह्यातील एकुण २०२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने किती प्रकरणे पात्र व अपात्र ठरविण्यात आली आहेत,

(४) असल्यास आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना अपूऱ्या पडत असल्याने शेतकरी आत्महत्या कायम स्वरुपी थांबविण्याच्या दृष्टिने कोणती ठोस उपाययोजना करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (०२-०९-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हास्तरीय समितीच्या चौकशीअंती माहे जानेवारी, २०२१ ते मार्च, २०२१ या कालावधीत एकूण २०२ आत्महत्या प्रकरणांपैकी १(६)५ आत्महत्येची प्रकरणे पात्र ठरविण्यात आली असून २४ आत्महत्यांची प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत. एकूण १३ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

(४) जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरविलेल्या १(६)५ प्रकरणी शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००(६) अन्वये प्रत्येक प्रकरणी रुपये १.०० लक्ष ची मदत मृत शेतकऱ्यांच्या वारसांस देण्यात आलेली आहे.

(५) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना

२) विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी “कृषी समृध्दी” योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना करण्यात आल्या.

३) शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना मोफत शिक्षणाची योजना यांच्या अंमलबजावणीला गती देणे यासाठी कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुर्नरचना करण्यात आली आहे.

४) शेतमालाला हमीभाव, PM-KISAN सारख्या योजनांमार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात येत आहे.

---

### कुरंडीमाल (ता. आरमोरी, जि. गडचिरोली) अंतर्गत वडेगाव (मेंढा) येथील आधारभुत धान खरेदी केंद्रावरील शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्याबाबत

**(४१) २९२५४ (१५-०६-२०२१). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळच्या वतीने आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, कुरंडीमाल, (ता.आरमोरी, जि. गडचिरोली) अंतर्गत वडेगाव (मेंढा) येथील आधारभुत धान खरेदी केंद्र सुरु करुन परिसरातील शेतकऱ्यांकडुन आधारभुत धान खरेदी योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये धान खरेदी करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खरेदी केंद्रावर परिसरातील जवळपास १४ ते १५ गावातील शेतकऱ्यांनी माहे मार्च, २०२१ पर्यंत धान विक्री करुनही अजुनपर्यंत विक्री केलेल्या धानाचे चुकारे अप्राप्त असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धान खरेदी केंद्रावरील शेतकऱ्यांचे धान विक्रीचे चुकारे अदा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. के.सी.पाडवी (१०-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, कुरुंडीमाल खरेदी केंद्रावर माहे मार्च, २०२१ अखेर वजन ४१,७४४.६६ क्विंटल व त्याची होणारी रक्कम रु.७.७९ कोटी धानाची खरेदी करण्यात आलेली असून शेतकऱ्यांना संपूर्ण धानाची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शहापूर (जि.ठाणे) येथील भातसा नदीवरील वासिंद गेरसे पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(४२) २९४४६ (१८-०६-२०२१). श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील भातसा नदीवरील वासिंदचा गेरसे पूल हा शहापूर, कल्याण व मुरबाड तालुक्यांना जोडणारा पुल असून गेल्या कित्येक वर्षापासून सदर पुलाची डागडुजी व दुरुस्ती न केल्यामुळे पुलाची दुरवस्था झाली असून सदर पुल कमकुवत व धोकादायक स्थितीत असल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम ३० ते ३५ वर्षापूर्वीचे असून पुलावरील संरक्षक कठडे तुटले असून खांबांना देखील तडे गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, आजूबाजुच्या परिसरातील हजारो वाहने दररोज तेथून जात-येत असल्यामुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता असल्याने सदर पूल पाडून त्याठिकाणी नवीन पुल बांधण्यात यावा अशी मागणी स्थानिकांनी तसेच प्रवाशांनी शासनाकडे करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, गेरसे पुलाचे नव्याने बांधकाम करण्यासाठी नऊ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक शासनास मंजुरीसाठी सादर केले असून, सदर अंदाजपत्रकास मंजूरी देऊन पुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (२३-०९-२०२१) :** (१) व (२) होय. हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्नाधीन रस्त्याच्या कामाबाबत निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

### कोराडी (ता.जि.नागपूर) येथे अवैध वाळूची वाहतूक होत असल्याबाबत

**(४३) २९७६७ (०९-०६-२०२१). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोराडी (ता.जि.नागपूर) येथे अवैध वाळूची वाहतुक होत असल्याचे दिनांक ११ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार कोराडी येथील अवैध वाळू वाहतूक रोखण्यासह वाळू वाहतूक करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (१७-०९-२०२१) :** (१), (२) व (३) स्थानिक पोलिस प्रशासनास मौजे कोराडी ता. कामठी जि. नागपूर येथे कोराडी नागपूर रोडने गौण खनिजाची अवैध वाहतूक करणारी ०५ वाहने निदर्शनास आली. त्यानुसार त्यांनी सदर वाहने पोलिस स्टेशन कोराडी येथे अटकावून ठेवून जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना पत्राद्वारे कळविले. त्यानुसार उप विभागीय अधिकारी, मौदा व तहसिलदार, कामठी यांनी संबंधित वाहन मालक यांचेकडून रु.११,७३,८००/- एवढा दंड वसूल करुन शासन जमा केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भूसावळ नगरपालिका हददीत अमृत योजनेचे काम पुर्ण करण्याबाबत

**(४४) ३०१८८ (१३-०६-२०२१). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : तारांकित प्रश्न क्रमांक ५४१ ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ शहरात अमृत अभियान योजनेअंतर्गत रुपये ९०.८४ कोटींचा पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून, सदर प्रकल्पाचे ३७ टक्के काम पुर्ण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अमृत योजनेचे काम माहे, २०२१ पर्यंत पुर्ण करण्याचे भुसावळ नगरपरिषदचे नियोजन असून देखील काम पुर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भूसावळ शहरात १० ते १५ दिवसांनी अशुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेचे काम तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२१) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
• केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत भुसावळ शहराच्या रुपये ९०.८४ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली असून सद्यस्थितीस प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) होय, हे खरे आहे.
• सदर योजनेंतर्गत समाविष्ट प्रस्तावित उदभव व जलशुद्धीकरण केंद्राच्या जागेत पाटबंधारे विभागाच्या सूचनेनुसार बदल झाल्याने योजनेची कामे विहित वेळेत पूर्ण होऊ शकलेली नाहीत.
• त्यानुषंगाने सुधारित अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) भुसावळ शहरातील नागरीकरणात मोठी वाढ झालेली असल्यामुळे सध्याची अस्तित्वातील पाणीपुरवठा यंत्रणा अपुरी पडत असल्यामुळे सद्यस्थितीत शहराला सात दिवसाआड प्राथमिक प्रक्रिया करून पाणीपुरवठा करण्यात येतो.
(४) व (५) मुळ मंजूर योजनेच्या अंदाजपत्रके व आराखड्यांमध्ये समाविष्ट उदभव स्थळात पाटबंधारे विभागाच्या सूचनेनुसार बदल झाला असून त्यानुसार नवीन ठिकाणी स्थळ निश्चितीकरण झालेले आहे. त्याचप्रमाणे जलशुद्धीकरण केंद्राच्या प्रस्तावित ठिकाणात देखील बदल झालेला आहे.त्यानुषंगाने सुधारित अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
• सद्यस्थितीस उंच जलकुंभ व वितरण व्यवस्थेची कामे प्रगतीपथावर आहेत.

---

**वाडा, (जि.पालघर) येथे वनीकरणांसाठी संरक्षण व संगोपन निधी उपलब्ध नसल्याबाबत**

**(४५) ३०२१३ (१२-०६-२०२१). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील (ता. वाडा) येथील वन विभागाच्या सामाजिक वनीकरण विभागामार्फत लागवड करण्यात आलेल्या झाडांसाठी दिनांक ४ मे, २०२० पासून संरक्षण व संगोपनासाठी निधी उपलब्ध न झाल्याने अनेक झाडे नष्ट होण्याच्या अवस्थेत आल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे काय, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वनीकरणासाठी आवश्यक तो संरक्षण व संगोपन निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०८-१०-२०२१)** : (१) सामाजिक वनीकरण विभागाच्या वृक्ष लागवडीसाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रु. ६९७५१ लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. मार्च २०२० पासून महाराष्ट्रात कोविड-१९ च्या संसर्गजन्य परिस्थितीमुळे वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२० /प्र.क्र.६५/ अर्थ-३ दि. ०४.०५.२०२० अन्वये राज्य योजनेंतर्गत मंजूर नियतव्ययामध्ये कपात करुन त्यानुसार सामाजिक वनीकरण विभागाकडे रु. १५२०६ लक्ष निधी राखुन ठेवण्यात आला होता.

सामाजिक वनीकरण विभागाच्या "महत्वाचे रस्ते/कालवे/रेल्वे लाईनच्या दुतर्फा वृक्ष लागवड करणे" (४४०६ ०४९२) या योजनेंतर्गत पालघर जिल्ह्यातील तालुका वाडा येथील वन विभागाच्या सामाजिक वनीकरण विभागामार्फत द्वितीय व तृतीय वर्ष वृक्ष लागवड, संरक्षण व संगोपन कामांसाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता एकूण अंदाजपत्रकीय रक्कम प्रमाणे रु. ११९.६० लक्ष निधीची आवश्यकता होती. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात प्राप्त ३३% निधीनुसार वन परिक्षेत्र, सामाजिक वनीकरण वाडा यांना रक्कम रु. ४०.४७ लक्ष निधीचे वाटप करणेत आले आहे.

सदर निधी मधून रोपवनाचे मरअळी झालेल्या ठिकाणी रोपांची लागवड करणे व प्रथम निंदणी कामांकरिता विनियोग झाला आहे. तथापि उर्वरित निंदणी, मातीचा भर देणे, पाणी देणे व संरक्षण व देखभाल करण्याकरिता आवश्यक रु. ७८.८५ लक्ष निधी अप्राप्त असल्याने स्थानिक वन कर्मचारी व ग्रामस्थांच्या माध्यमातून रोपवनांच्या संरक्षणाची कामे करण्यात आली आहेत.

(२) व (३) महाराष्ट्रात कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे टाळेबंदी जाहिर करुन अनेक निर्बंध घालण्यात आले. सदर निर्बंधामुळे राज्याच्या कर व करेत्तर महसूलात घट झाल्याने आवश्यक तो संरक्षण व संगोपन निधी उपलब्ध करुन देणे शक्य झालेले नाही.

---

**मुंब्रा (जि.ठाणे) येथील प्राइम क्रिटिकेअर रुग्णालयामध्ये आग लागून रुग्णांचा झालेला मृत्यु**

**(४६) ३०२१९ (१८-०६-२०२१). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा (जि.ठाणे) येथील शिमला पार्क भागातील प्राइम क्रिटिकेअर रुग्णालयामध्ये आग लागल्याने रुग्णांना बाहेर काढताना चार रुग्णांचा गुदमरुन मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दिनांक २९ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच मृत व्यक्तींच्या वारसांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२१)** : (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा येथील प्राईम क्रिटीकेअर रुग्णालयाला दिनांक २८.०४.२०२१ रोजी आगीची दुर्घटना घडली होती.

सदर दुर्घटनाग्रस्त रुग्णालयाच्या अतिदक्षता व जनरल वॉर्ड उपचार घेत असलेल्या रुग्णांना इतर रुग्णालयात स्थलांतरीत करण्यात आले असता स्थलांतरानंतर रुग्णालयात ४ रुग्णांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील ३४७ रुग्णालयांना फायर ऑडिट करण्याकरीता जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेने नोटीसा बजाविल्या आहेत.

त्यानुसार २७६ रुग्णालय आस्थापनांना फायर कंप्लायन्स सादर केले असून इतर आस्थापनासंदर्भात कार्यवाही सुरु असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) मुंब्रा येथील या प्राईम क्रिटीकेअर रुग्णालयास दिनांक २८.०४.२०२१ रोजी लागलेल्या आगीच्या दुर्घटनेची चौकशी करण्याकरीता महानगरपालिका स्तरावर गठीत ७ सदस्यीय चौकशी समितीने आगीच्या घटनेची खालील कारणे नमूद केली आहेत:-

* दुर्घटनाग्रस्त रुग्णालयातील विद्युत वितरण व्यवस्थेत विद्युतभार ओवरलोड झाल्याने शॉर्टसर्किट होउन वायरींगमध्ये आग लागली.

* संबंधित रुग्णालयाने विज वितरण कंपनीकडून मंजूर केलेल्या क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेचा विद्युतभार वापरात आणला होता.

* सदर दुर्दैवी घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णांच्या कुंटुंबीयांना रु. ५ लक्ष प्रत्येकी आर्थिक नुकसान भरपाई प्रदान करण्यात आली आहे.

* उपरोक्त चौकशी समितीच्या अहवालास अनुसरून सदर दुर्घटनाग्रस्त रुग्णालय बंद ठेवण्याबाबत ठाणे महानगरपालिकेने आदेश पारित केले आहेत.

* तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रात विविध रुग्णालयाच्या अग्निसुरक्षेच्या उपाययोजना तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या सक्षमीकरण करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

* ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी रुग्णालयाच्या व्यवस्थापकांना उपरोक्त दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर विविध निर्देशाचे पालन करण्याबाबत दिनांक ०९.०६.२०२१ रोजी आदेश पारित करण्यात आले आहेत.

* सदरची इमारत अनधिकृत असून संबंधितांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिवा (जि.ठाणे) येथील नागरी वस्तीमधील अनधिकृत क्षेपणभूमी बंद करण्याबाबत

**(४७) ३०५५९ (१८-०६-२०२१). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवा (जि.ठाणे) येथील नागरी वस्तीमधील अनधिकृत सुरु असलेली क्षेपणभूमी वारंवार मागणी, आंदोलने करुनही अद्यापही बंद करण्यात आले नसल्याची बाब दिनांक २५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्षेपणभूमी सुरु असल्याने परिसरातील नागरिकांना प्रदूषणामुळे घसा, त्वचा व अन्य स्वरुपाचे गंभीर आजार होत असतानाही क्षेपणभूमी बंद न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार सदर क्षेपणभूमी बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१) व (२) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात दररोज १६०० मेट्रीक टन घनकचरा निर्माण होत असून घन कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २०१६ नुसार घनकचऱ्याचे संकलन व वाहतुक करण्यात येते.

दिवा येथील क्षेपणभूमीवर कचऱ्याची भूमीभराव पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येत असून दिवा येथील क्षेपणभूमीबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

सदर परिसरातील नागरिकांना घसा, त्वचा व अन्य आजार होऊ नये याकरिता वेळोवेळी त्या परिसरात जंतूनाशक व दुर्गंधीनाशक फवारणी करुन रोगराई पसरू नये याबाबत सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-
* मौजे डायघर येथे एकूण १९.८९ हेक्टर जमीन शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आली असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन केंद्रीय घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यास मान्यता प्रदान केली आहे.
* तसेच विकेंद्रीत पध्दतीने कचरा विल्हेवाटीचे प्रकल्प हाती घेण्यात आले असून त्यापैकी काही प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत.
* दिवा येथील क्षेपणभूमीच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २२.०६.२०२१ रोजी झालेल्या महानगरपालिका स्तरावरील बैठकीत विकेंद्रीत पध्दतीने कचरा प्रक्रिया पूर्ण क्षमतेने लवकरात लवकर सुरू करुन दिवा येथे जाणारा कचरा टप्प्या-टप्प्याने बंद करण्याच्या सूचना दिल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिका हददीतील तलवाडे डॅम ते मालेगांव जलशुध्दीकरण केंद्रापर्यतच्या जुन्या पाईपलाईनची झालेली दुरवस्था

**(४८) ३११३१ (१८-०६-२०२१). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिका हददीतील तलवाडे डॅम ते मालेगांव जलशुध्दीकरण केंद्रापर्यतची जुन्या पाईप लाईनची अत्यंत दुरावस्था झाल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाईप लाईन ही गत ४० ते ४५ वर्षापूर्वीची जुनी पाईप लाईन असून ठिकठिकाणी गळती लागली असल्याने मोठया प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ७ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करुन सदर बाब निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने उक्त जुनी पाईप लाईन तात्काळ बदलण्याबाबत तसेच आवश्यक त्या निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२१) :** (१) व (२) तळवाडे साठवण तलाव ते मालेगाव जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत अस्तित्वात असणारी पाईपलाईन ही सन १९७५ मध्ये टाकण्यात आलेली आहे.

• सदर पाईप लाईन जुनी असून शहरातील दैनंदिन पाणीपुरवठा यामार्फत करण्यात येतो.

• सदर पाईप लाईनबाबत किरकोळ प्रमाणात पाणी गळतीची माहिती मिळताच तात्काळ दुरुस्ती करण्यात येते.

• दिनांक २९ मे, २०२१ रोजी शहरातील पाणी पुरवठा खंडित करून किरकोळ दुरुस्तीचे काम व एअर व्हाल्व दुरुस्तीचे काम करण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) सद्यस्थितीत तळवाडे साठवण तलाव ते मालेगाव जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत समांतर जलवाहिनी टाकण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही मालेगाव महानगपालिकेमार्फत प्रगतीपथावर आहे.

---

## राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(४९) ३२२२२ (११-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतच्या प्रस्तावास वित विभागाने सहमती दर्शविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करताना विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करून घेण्याबाबत वित्त विभागाने सांगितले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने विधी व न्याय विभागाचे अभिप्राय शासनाने प्राप्त करून घेतले आहेत काय,

(४) असल्यास, याबाबत विधी व न्याय विभागाने कोणते अभिप्राय दिले आहेत आणि तदनुसार राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग

लागू करण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (३०-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय.
(४) "सहाव्या वेतन आयोगामध्ये अतिप्रदान झाल्याप्रकरणी मा.उच्च न्यायालयात याचिका न्यायप्रविष्ट असून याचिकाकर्त्यांच्या वेतनाच्या पुनर्निश्चितीची बाब संबंधित असल्याने मा.न्यायालयाचा निर्णय लागेपर्यंत अतिप्रदान झालेल्या प्राध्यापकांना ७ वा वेतन आयोग लागू करण्याची बाब प्रतिक्षाधीन ठेवण्यात यावी.", असे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहेत.

विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकवर्गीयांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. AUG-३७१९/C.R.४१/६-A दि.१२.०८.२०२१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहरी भागातील अकृषिक कर (एन.ए.) रद्द करणेबाबत**

**(५०) ३२३८४ (२३-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाकडुन आकारण्यात येणारा अकृषिक कर (एन.ए.) गावठाणाप्रमाणे शहरी भागातील जमिनी निवासी केल्यानंतर त्यांना लावण्यात येऊ नये याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था फेडरेशनकडून शासनाकडे पाठविण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरी भागातील सर्व्हे क्रमांकाना कर लावण्यात येऊ नये याबाबतची मागणी महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था फेडरेशनने केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल विभागाने हा कर गृहनिर्माण संस्थांकडून घेण्यास दिरंगाई केल्याने नागरिकांना दंड आकारण्यात आल्याचे आढळून आले असल्यामुळे दंडासह आकारण्यात आलेला अकृषिक कर (एन.ए.) रद्द करण्याची मागणी फेडरेशन सन २००३ पासून करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शहरी भागातील अकृषिक कर (एन.ए.) रद्द करणेबाबत महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था फेडरेशनकडून शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (०४-१०-२०२१) :** (१), (२), (३) व (४) "राज्य शासनाकडुन आकारण्यात येणारा अकृषिक कर (एन.ए.) गावठाणाप्रमाणे शहरी भागातील जमिनी निवासी केल्यानंतर त्यांना लावण्यात येऊ नये", अशा आशयाचे महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण

संस्था फेडरेशन यांचे निवेदन शासनाच्या या विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, या विभागाच्या दिनांक १/४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४५ व महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी नियम, १९६९) च्या नियम ८ खाली दंडाच्या आकारणीबाबत निर्देश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार शेतजमिनीचा अकृषिक वापर करण्याकरिता सक्षम महसूल प्राधिकाऱ्यांकडून मंजूरी घेण्यात आली नसेल अथवा अकृषिक प्रयोजनाकरिता सक्षम महसूल प्राधिकाऱ्याकडून मंजूरी देण्यात आलेल्या वापराव्यतिरिक्त इतर अकृषिक प्रयोजनाकरिता जमिनीचा अनधिकृतरित्या वापर करण्यात आलेला असेल तसेच संबंधित नियोजन प्राधिकरणाची किंवा बांधकामास मंजूरी देण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेण्यात आलेली नाही. अशा प्रकरणांमध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४५ व महाराष्ट्र जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी नियम, १९६९ च्या नियम ८ खालील दंडाची रक्कम ही अकृषिक आकारणीच्या ४० पट इतकी आकारण्यात यावी व ज्या ठिकाणी महसूल प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेण्यात आलेली नाही, परंतु नियोजन प्राधिकरणाची (बांधकाम) परवानगी घेण्यात आली आहे अथवा अशा प्रकरणी कलम ४५ खालील दंडाची रक्कम ही अकृषिक आकारणीच्या २० पट इतकी आकारण्यात येते.

तथापि, सदरचे धोरण हे दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत अवलंबिण्यात यावे व सदर कालावधी संपल्यानंतर अकृषिक आकारणीच्या सरसकट ४० पट इतकी दंडाची रक्कम शासनाकडे भरणा करणे अनिवार्य राहिल अशी तरतूद वरील दिनांक १/४/२०१७ निर्णयामध्ये नमूद केली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १११ ते ११४ अन्वये नागरी क्षेत्रातील अकृषिक आकारणीचे प्रमाण दर निश्चित करण्याबाबत निकष ठरविण्यात आले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ११३ मधील तरतूदीनुसार दर पाच वर्षानी (हमी कालावधी), अकृषिक आकारणीचे प्रमाणदर निश्चित करण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

तथापि, सुधारित करावयाच्या अकृषिक प्रमाणदराच्या आकारणीस व वसूलीस वेळोवेळी देण्यात आलेली स्थगिती दि.०५/०२/२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये उठविण्यात आली असून त्याद्वारे सुधारित करावयाच्या अकृषिक दराबाबत क्षेत्रीय अधिकारी यांना दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत. “अकृषिक कर” हा जमीन महसूल विषयक “पायाभूत कर” आहे. त्यामुळे सदर कर रद्द करणे शक्य होत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.